


खोजाची चाळ
जेव्हा
श्रमिक नगर
होते–

२२ मार्च ६९
चालीस पैसे

# माणूस



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : त्रेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मार्च, ११

गेल्या अंकापासून सुरू केलेली ' झुंड ' लेखमाला गाजणार ! आपण वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या लेखमालांनी ' माणूस 'ला एक खास दर्जा प्राप्त करून दिला आहे व वाचकांनाही एक खास वळण लावले आहे. अभिनंदन !

' माणूस 'मधून दिल्ली दरबार बंद झाल्याचं खटकतं. ' मुंबई समाचार ' ठीक ! ८ ता. च्या ' मुंबई समाचार 'मधून श्री. सु. ल. सोमण ह्यांनी करून दिलेली ' नॅशनल सॅंपल सर्व्हे 'ची ओळख अतिशय बोलकी वाटली. श्री. छगलांच्या भाषणावरील भाष्यही उत्तम. ह्याच अंकातल्या ' लेकुरवाळी ' गोष्टीच्या कथानकाचे ' अंगाई ' ह्या चित्रपटाच्या कथानकाशी—पात्रांची नावं बदलल्यास—कमालीचं साम्य जाणवतं. लेखिकेतर्फे खुलासा होईल का ?

सुरेश दिवेकर, वडाळा, मुंबई.

स. न. मार्च, १०

८ मार्च १९६९ चा ' माणूस 'चा अंक वाचला. ब्रिगेडियर जे. पी. दळवी यांनी लिहिलेला आणि ॲड. माधव कानिटकर यांनी अनुवादिलेला ' झुंड ' हा लेख

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

अतिशय आवडला. लेखकाच्या स्वानुभवसिद्ध लेखनाबद्दल आणि निवेदकाच्या कौशल्यपूर्ण निवेदनपद्धतीबद्दल अभिनंदन ! तसेच श्री. नीलकंठ दामले यांनी लिहिलेली मनोगते इतकी मनोवेधक आहेत की, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देणे अत्यंत जरुरीचे आहे.
**श. शं. घोरपडे, पुणे.**

**स. न.** **मार्च, ९.**

दि. ८ मार्च ६९ चा 'माणूस'चा अंक वाचला. मनोगते हे नवे सदर वाचून आनंद झाला. श्री. नीलकंठ दामले यांचे विचार सडेतोड व स्पष्ट आहेत त्याबद्दल धन्यवाद !

'माणूस'मध्ये बऱ्याच शुद्धलेखनाच्या चुका आढळतात. त्यामुळे वाचताना काहीतरी चुकल्यासारखे वाटते. सुधारणा केल्यास उत्तम.

**दिनकर चिंदरकर, मुंबई १३.**

**स. न.** **मार्च, ८**

आतापर्यंतचे 'माणूस'चे अंक मला फार आवडले. दर वेळी मुखपृष्ठावरील बदल बघूनच आनंद वाटतो. चालू ८ मार्चच्या अंकातील ब्रिग्रेडियर जे. पी. दळवी यांची लेखमाला (अॅ. माधव कानिटकर यांनी केलेले निवेदनही) मला फारच आवडली. सर्व भारतीयांनी ती अवश्य वाचावी अशी आहे. आपण ती प्रसिद्ध करीत आहात, त्याबद्दल आपल्याला व अॅ. माधव कानिटकरांना धन्यवाद !

**लक्ष्मण अंबिके, मुंबई ७०.**

**स. न.** **मार्च, ७**

चार वर्षांपासून मी 'माणूस' वाचतो आहे. ज्ञानाचा सतत लाभ घेत आहे. विशेषतः 'नाझी भस्मासुराचा उदयास्त', 'होल्गा जेव्हा लाल होते' या कथामालांनी राजकीय दृष्ट्या आमच्या ज्ञानात भर घातली. ह्या लेखमालेंविषयी धन्यवाद.

८ मार्चच्या अंकात सुरू झालेली 'झुंड' लेखमाला वाचली. मनाची पकड घेतली. ब्रिगेडियर जॉन परशराम दळवी ह्यांची स्पष्ट त परखड शब्दात वस्तुस्थिती मांडण्याची पद्धत आवडली. खरी पार्श्वभूमी सांगण्यास ते कचरत नाहीत. त्यांनी कटुसत्य लिहिले. त्यांच्या Himalayan Blunder ह्या इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर अॅड. माधव कानिटकर ह्यांनी उत्तम मराठी भाषेच्या नमुन्यात सादर केलंय.
**वि. वि. कौंडिण्य, अहमदनगर.**

**स. न.** **फेब्रुवारी, २७**

माझ्या काकांनी मुंबईहून पाठवलेला 'माणूस'चा २५ जानेवारीचा अंक पोचला. त्यातल्या 'डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने' या लेखावरील माझे काही विचार मी आपल्याला कळवीत आहे.


भारतात जेव्हा, शास्त्रज्ञ भारताबाहेर राहतात असे म्हणतात—तेव्हा शास्त्रज्ञ

कुणाला म्हणतात, मला कळत नाही. पण मला वाटते, जे pure science मध्ये research करत असतात ते शास्त्रज्ञ. माझ्या मते या देशात भारतीय इंजिनियर्स जास्त आहेत व बहुतेकजण M. S. असतात. इकडे आलेल्या माझ्या माहितीच्या लोकांवरून असे म्हणावेसे वाटते की, बहुतेकजणांची बौद्धिक पातळी भारतात असणाऱ्या त्यांच्या दोस्तांपेक्षा जास्त नसते. असली तर कमीच असते. व अशांना भारतात गेल्यावर जास्त पगार का द्यावा? मला इथे बऱ्याच जणांनी यावर प्रश्न विचारला होता की, तुला भारतात परत गेल्यावर चांगली नोकरी मिळेल की नाही वगैरे वगैरे. मी सगळ्यांना सांगतो की, माझ्याबरोबर पास झालेल्यांना जेवढा पगार मिळत असेल तेवढेच मी expect करतो. इकडे जे बरेच जण कायमचे राहण्याचा विचार करतात त्याचे कारण त्यांना इकडे भारतापेक्षा जास्त पगार मिळतो म्हणून नव्हे, की जास्त मान मिळतो म्हणूनही नाही. उलट इथे काही झाले तरी तो परकीय समजला जातो व त्याला management मध्ये प्रवेश मिळणे कठीण असते. इकडे डायरेक्टरपासून भंग्यापर्यंत प्रत्येकजण दुसऱ्याला पहिल्या नांवाने हाक मारत असल्यामुळे मानाचा प्रश्नही नाही. इथला पगार इथल्या राहणीच्या मानाने पुरेसाच असतो. परंतु त्याच पगारात जास्त easy life होते. बस, गाडीची लाईन नाही. स्वतःची कार असल्यामुळे कधीही कुठेही जाता येते. मुख्य म्हणजे माणसाच्या ज्या रोजच्या गरजा आहेत, त्यासाठी झगडावे लागत नाही.

आमचे तर असे मत आहे की, अमेरिकेत राहणारा भारतीय भारताला मदतच करत असतो. तो इथे राहिल्यामुळे अन्न, नोकरी, लोकसंख्या व जागा हे सर्व प्रश्न एका माणसापुरते कमी होतात. एखाद दुसरा माणूस त्या जागी नोकरी मिळवू शकतो. शिवाय तो डॉलर्स पाठवून घरी मदत करू शकतो व परदेश हुंडणावळीचा प्रश्नही कमी करतो. त्याने पाठवलेला प्रत्येक डॉलर ७॥ रुपयांएवढा असल्यामुळे तो घरी राहण्यापेक्षा जास्त मदत करू शकतो.

मला एवढेच म्हणायचे आहे की, जर एखादा इकडे कायमचा राहिला तर त्यामुळे देशाचे नुकसान झाले वगैरे म्हणणे व त्याने देशासाठी परत जावे असे म्हणणे चुकीचे आहे. त्याची काही Family obligations असतील तर त्याने जरूर जावेच. पण प्रत्येकावर भारतात येण्याची सक्ती करणे योग्य नाही. त्यामुळे ब्रेनड्रेन होते हे म्हणणे तर साफच चूक आहे. या विषयावर जितके लिहावे तितके थोडेच. भारतातील लोकांना फक्त डॉ. खोराना प्रकरणाच्या वेळी थोडीशी आठवण येते एवढेच.


**श्रीकांत भास्कर बेंद्रे**
Box 251 Kingston
R. I. O. 2881 U. S. A.



खोजाची चाळ : दर्शनी भाग


मुंबईत सुमारे एक हजार चाळी दुरुस्तीपलिकडच्या स्थितीत आहेत असे म्हणतात. केव्हा एखादी भिंत कोसळेल, जमीन खचून जाईल, कौलाराची वाताहत होईल याचा येथे नेम नाही. 'मृत्यूचे सापळे' असे या चाळीचे वर्णन केले जाते. मला 'मृत्यूचे पाळणे' हे वर्णन अधिक यथार्थ वाटते. कारण साधे चालले तरी हे क्षयी माणसारखे दिसणारे सांगाडे सारखे झोकांडत असतात, हलत–हिंदकाळत असतात, आतील फासळी न् फासळी बाहेरून दिसत असते. चाळी कसल्या? तीन तीन, चार चार हजार वस्ती असलेली ही छोटी गावेच आहेत. फक्त गावात हवापाणी, भरपूर जागा असते — राहायला माणूस नसतो. येथे नऊ बाय नऊच्या एका खोलीत किमान दहा माणसे, सर्वसाधारणत: पंधरा माणसे व शिकस्त वीस ते पंचवीस जण राहत असतात. राहत असतात हेही म्हणणे चूक. जेवण्याखाण्यापुरता व आलटून पालटून झोपण्यापुरता नाईलाजाने त्यांना या पाळण्यांचा आश्रय घ्यावा लागतो. शाळेतील मुलापासून म्हाताऱ्याकोताऱ्यापर्यंत जो तो शक्यतो बाहेरच दिवस कटवीत असतो.

# खोजांची चाळ जेव्हा श्रमिक नगर होते–




श्रमिक नगर : दर्शनी भाग

दहा–बारा दिवसांपूर्वी अशाच एका पाळण्यात एक दिवस माझा मुक्काम होता. मध्यमुंबईतील करीरोड भागात स्टेशनलगतच 'खोजाची चाळ' या नावाने हा पाळणा सुपरिचित आहे. बहुसंख्य बिऱ्हाडकरू गिरणीकामगार आहेत. काही उत्तर-प्रदेशी आहेत, बरेचसे कोल्हापूर–रत्नागिरी भागातून आलेले आहेत. लागून लागून असलेल्या तीन इमारतींची मिळून ही एक चाळ झालेली आहे. एकूण बिऱ्हाडांची संख्या एकशे ब्याण्णव. लोकसंख्या सुमारे तीन हजार. म्हणजे नऊ बाय नऊच्या प्रत्येक खोलीत सरासरी पंधरा माणसे येथे राहतात. ही चाळ राहण्यास धोका-दायक आहे, ही त्वरीत पाडली जावी अशी मुंबई नगरपालिकेची, १९०४ मधील सूचना होती. तरीही ही अद्याप पाडली गेली नव्हती, माणसांची वारूळे येथून हलत नव्हती.



खोजाची चाळ : अंतर्भाग



श्रमिक नगर : अंतर्भाग

पासष्ट वर्षापूर्वी जी पाडली जाणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अवश्य होते, तिचा चेहरामोहरा गेल्या सहा महिन्यात मात्र पार बदलून गेलेला मला समजला. हा बदल कसा झाला हे पाहण्यासाठीच आज मुद्दाम मी येथे आलेला होतो.

दिवस होळी पौर्णिमेचा होता. साऱ्या गिरणगावाला सुट्टी होती. खोजाची चाळ मात्र संध्याकाळच्या सभेच्या कार्यक्रमासाठी झटत होती. चाळीसमोरची मोकळी जागा स्वच्छ करणे हे पहिले काम. बांधकामाचे विविध साहित्य तेथे विखरून पडलेले होते. दोन–चार महिन्यापूर्वीची वेळ असती तर या जागेत सभा होणेच शक्य नव्हते. वर्षानुवर्षे या जागेवरून चाळीची उघडी गटारे वाहत होती. नुकतीच ती भुयारी झाल्याने तेथे सभा घेण्याचे ठरले व आदल्या रात्रीच चाळीतील तरुण कार्यकर्त्यांनी जागेवरचे अवजड सामान इकडे तिकडे हलवून सभेची व्यवस्था चोख करून ठेवली. नुकत्याच दुरुस्ती पूर्ण झालेल्या जिन्याजवळच्या दोन खोल्यात माझी उतरण्याची व्यवस्था होती. या दोन खोल्यातील गायकवाडकुटुंब तळमजल्या-वरच्या एका खोलीत दुरुस्तीकाळात हललेले होते, त्यामुळे त्या तात्पुरत्या मोक-

ळचाच होत्या. दुरुस्तीकाळात एकाही कुटुंबाला येथून लांबवर स्थलांतर करावे लागले नाही ही एक आश्चर्य वाटण्याजोगी घटना आहे. ज्या खोल्या दुरुस्तीला निघतील त्यातील बिऱ्हाडांची सोय तेथेच आपापसात लावली गेली. एकशे ब्याण्णव बिऱ्हाडे अशा तऱ्हेने बिनबोभाट हलली व पुन्हा दुरुस्त झालेल्या आपल्या नव्या जागेत आनंदाने परतली. लोकशक्ती मुळापासून जागृत झालेली असेल तर अवघड भासणाऱ्या कितीतरी समस्या अशा सुरळीतपणे सहज सुटत जातात याचा हा एक चांगला पुरावाच म्हटला पाहिजे.

दिवसभर माणसे येत होती, चाळीच्या दुरुस्तीची लांबलचक कहाणी त्यांच्याकडून मला समजत होती.

चाळ समिती १९६२ मध्ये प्रथम स्थापन झाली. याला एक तात्कालीक निमित्त घडले. चाळीचा मालक नूरअली अब्दुल्ला हुसेन झांझारिया (खोजा) याने पाणीपट्टी न भरल्याने नगरपालिकेने चाळीचा पाणीपुरवठा एक दिवस तोडला. भाडेकरू एकत्र आले व त्यांनी दिवसरात्र खटपट करून, मालकाची समजूत पटवून पाणीपुरवठा पुन्हा सुरू केला. पण असे प्रसंग वरचेवर येणार हे सर्वांना दिसत होते. त्यामुळे कायम संघटना उभी करण्याचे ठरले. त्यातून आजच्या 'खोजाची चाळ रहिवासी मंडळा'ची सुरूवात झाली. मालकाला चाळ लवकर पडावी असे वाटत होते, त्यामुळे दुरुस्तीसाठी तो एक पैही खर्च करू इच्छित नव्हता. मोकळ्या जागेचे तीनशे रुपये वाराप्रमाणे अधिक पैसे येतील हा त्याचा साधा हिशोब होता. भाडेकरूंनाही इतक्या मध्यवस्तीतील, कामाला यायला जायला सोयीची, सात रुपये खोली भाड्याची जागा सोडावीशी वाटणे शक्य नव्हते. त्यामुळे मालकाचे भाडे थोपवून या साठलेल्या रकमेतून दुरुस्ती चालू करण्याचा निर्णय घेतला गेला. नियमाप्रमाणे तीन ते पाच वर्षांचे भाडे दुरुस्तीसाठी बिऱ्हाडकरू खर्च करू शकत होते. असे पन्नास एक हजार रुपये जमले. पण चाळदुरुस्तीची हमी घेण्यास कोणी इंजिनियर पुढे येईना. उलट चाळ दुरुस्तीपलिकडची आहे, जमलेले पैसे भाडेकरूंना परत करून टाका असा तज्ज्ञांचा व नगरपालिका अधिकाऱ्यांचाही निर्वाणीचा सल्ला होता. गृहनिर्माण मंडळाकडे खटपटी झाल्या, गलिच्छ वस्ती निर्मूलन योजना लागू करण्याचा विचार पुढे आला, मागे पडला. मंत्री–अधिकारी भेटी देत होते. पण उपाय कोणालाच सापडत नव्हता. चाळ दुरुस्तीला हात घालण्यास कोणीच धजावत नव्हते, चाळ सोडून भाडेकरूही दुसरीकडे कुठे हलत नव्हते, हलू शकत नव्हते.

चाळीची डळमळ वाढत होती, चाळ समितीच्या कार्यकर्त्यांचा उत्साहही खालीवर होत होता. एका खोलीत चालले तर तिसऱ्याच खोलीत माती पडत होती, भिंतीला खिळा वगैरे ठोकल्याचे तर कुणाला आठवतच नव्हते. पावसाळ्यातली दैना तर शहारे आणणारी असायची. बाहेर वाहती गटारे. तीन हजार माणसा-

साठी चालू स्थितीतले फक्त चार–पाच संडास. भेट देणारे मंत्री अधिकारीही दहा–पंधरा मिनीटापेक्षा येथे उभे राहू शकत नसत. आतही चिकचिकाट. वरून गळती, खालून ओल, बाजूने पाझर. मुंबईचा पाऊस. विजेचा अभाव. डासांचे थवे. रात्रपाळीहून आले तरी झोप नाही. दिवसपाळीवर असले तरी जीव सतत धास्तावलेला, घरी आज काय प्रकार पाहायला मिळणार आहे ?

६८चा ऑगस्ट महिना उजाडला. एक दिवस ऐन मध्यरात्री चाळकऱ्यांना एकदम जाग आली. खोजाची चाळ करी रोड पुलाला लागूनच आहे. अशीच एक चाळ पुलाच्या दुसऱ्या बाजूसही आहे. तिथे अचानक काही गडबड उडाली, गलका माजला. चाळीचा काही भाग कोसळून त्याखाली आठ जणांचा अंत झाला होता. त्यानंतर मात्र खोजाच्या चाळीची झोपच उडाली. शेजारीच हा काळप्रसंग घडला होता. या चाळीहूनही खोजाची चाळ अधिक धोकादायक स्थितीत होती. चाळकऱ्यांनी निर्णय घेतला. एका अनोळखी, फारशा ' सुप्रसिद्ध ' नसलेल्या इंजिनीयरला रातोरात गाठून त्यांचे साहाय्य मिळविले. हे श्री. वाळिंबे. ' रात्री मी चाळ पाहायला आलो तर आत प्रवेश करण्याचे धैर्य मला होईना. इतके सारे भयाण दिसत होते. त्यातल्या त्यात दर्शनी बाजूची भिंत व काही खोल्या तर तावडतोब खाली उतरवणे अवश्य होते. दिवससुद्धा उजाडायची वाट न पाहता मी माणसे गोळा केली. बिऱ्हाडकरू हलवले. भिंती उतरवायला सुरुवात केली. हे काम करायला ठेकेदार मिळणे हेही अवघड गेले. कोण सुखासुखी असा धोका पत्करील ?' वाळिंबे सभेपूर्वी मला भेटले तेव्हा म्हणत होते.

वाळिंबे यांनी हे काम सुरू करण्यापूर्वी एक-दोन इंजिनीयर्सनी ही जबाबदारी स्वीकारली होती. पण त्यांचेबाबत चाळ समितीचे अनुभव फारसे समाधानकारक नव्हते. एकाने दुरुस्ती सुरू करण्यापूर्वीच तीस-चाळीस हजार रुपये आगाऊ मागितले. भाडेकरूंनी दरमहा भाडे साठवून तोपर्यंत साठ-सत्तर हजार रुपये जमा केले होते हे खरे; परंतु सार्वजनिक पैसा. आगाऊ उचल दिली आणि काम झालेच नाही, अर्धवट किंवा चुकीचे झाले तर ठपका येणार, शेजारीपाजारी कुजबुजणार, चाळ समिती बदनाम होणार ही कार्यकर्त्यांची भीती. चार लोकांचा कारभार, जबाबदारी निश्चित कोणावरच नाही, त्यामुळे इंजिनीयरने आगाऊ पैसा मागितला तर धंद्याच्या दृष्टीने त्याचेही फारसे चूक नाही. अशा अनिश्चिततेमुळे एक-दोनदा सुरू झालेल्या कामातही खंड पडलेला होता. पण वाळिंबे यांच्या हाताला मात्र यश आले. गेले सात-आठ महिने दिवसरात्र काम चालू आहे. जवळजवळ संपतही आले आहे. ठेकेदार रशीदभाई सांगत होता : देवावर भरंवसा ठेवून वावरत होतो. इथे हातोडी मारली तर पन्नास फुटावरचे दुसरेच एखादे ढेकूळ पडत होते. काम पुरे होईतो मला स्वस्थ झोप येत नव्हती. रशीदभाईच्या कामावर चाळकरीही खूष होते. ठेकेदार आणि मालक असे नाते उरलेच नव्हते. इतरांप्रमाणे तोही सकाळ-

पासून या घोळक्यात, संध्याकाळच्या सभा–कार्यक्रमात सामील झालेला दिसत होता.

कधीकधी विनोद घडे. बांधकामासाठी पाण्याची दोन टाकी बांधली होती. यामुळे डासचिलटे वाढतात, आरोग्याला धोका पोचतो या 'सद्हेतुने' नगरपालिकेच्या सेवकांनी काम बंद ठेवण्याची नोटीस एकदा बजावली. सभेच्या अध्यक्षस्थानी असलेले या भागातील इंटक कार्यकर्ते श्री. गोविंद महादेव हुले आपल्या भाषणात चिडून म्हणाले : जनावरसुद्धां राहू शकणार नाही असा नरक येथे वर्षानुवर्षे वाहत होता. त्यावेळी नाही नगरपालिकेच्या नोकरांना मालकावर आधी नोटीस बजावण्याची बुद्धी सुचली. आता एकदम स्वच्छतेचे कारण दाखवून नोटीसा काढताहेत. तरी बरे गटारे भुयारी केल्याने पूर्वीपेक्षा शेकडोपटींनी स्वच्छता येथे होती. सरकारी यंत्रणा कशी अडवणूक करते याचे आणखीही काही किस्से त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. प्रास्ताविकात चाळसमितीचे अध्यक्ष श्री. मारुती अप्पा गायकवाड यांनीही या विषयाला स्पर्श केलाच होता.

एकदा मंडळी अशीच एका मंत्र्यांच्या बंगल्यावर संध्याकाळच्या वेळी काही अडचण दूर करण्यासाठी म्हणून गेली होती. हे मंत्री पूर्वी शिक्षक होते, मुंबईच्या सामाजिक क्षेत्रात त्यांनी खूप कामही केलेले होते. या चाळीची कथा त्यांना संपूर्ण माहीत होती व मंत्री होण्यापूर्वी ते येथे येऊनही गेलेले होते. अशी ओळखीची पार्श्वभूमी असल्याने चाळ समितीच्या कार्यकर्त्यांनी बंगल्यावर जाण्याचे धाडस केले. पण स्वागत वेगळेच झाले. 'काय, चाळ पडली कां ?' हा मंत्र्यांचा पहिलाच सवाल ऐकून मंडळी थंडच पडली. एक गरम डोक्याचा कोल्हापुरी गडी मात्र बोलून गेला–'पडली असती साहेब, तर आम्ही असे आलो नसतो. मुलाबाळांसकट सगळेच आम्ही या बंगल्यात घुसलो असतो.' काम झाले नाही यापेक्षा मंत्र्यांच्या बेफिकीर वागणुकीची खंत कार्यकर्त्यांना विशेष जाणवली. एरव्ही मी या मंत्र्यांचे नावही येथे दिले असते. पण 'नाव छापू नका' अशी कार्यकर्त्यांचीच इच्छा दिसली. म्हणून इत्यलम्.

एकूण क्षेत्रफळ २०५० वार. लोकसंख्या अंदाजे तीन हजार. अशा दाटीवाटीतच एकीकडे बांधकाम जोरात चालू ठेवायचे; जेवणखाण, उठवस, झोप हेही नित्यव्यवहार सांभाळायचे; त्यामुळे अधूनमधून एखादा अपघातही घडे. गणपत जावळे या कामगाराच्या पायावर मोठा बोजा पडल्याने त्याला हॉस्पिटलमध्ये काही दिवस ठेवावे लागले. आता तो बरा आहे, पण त्याच्या आजारपणाचा सर्व खर्च चाळ समितीने केला, नोकरीवरच्या रजेचा ताण त्याच्या घरच्या चुलीवर पडू दिला नाही.

कोर्टाची टांगती तलवार चाळकऱ्यांवर सतत होतीच. ४९९ कलमाप्रमाणे जास्तीत जास्त पाच वर्षांचे भाडे चाळकरी दुरुस्तीसाठी वापरू शकत होते. दुरुस्ती-

खर्च गेला होता दोन सव्वादोन लाखाच्या घरात. पाच वर्षांच्या भाड्याची रक्कम जास्तीत जास्त होत होती सत्तर ते ऐंशी हजार. पाच वर्षांची मुदत उलटून गेली होती. भाडेवसूलीसाठी मालक कोर्टात गेलेलाच होता. भाडे थकवावे तर केव्हा भांडी बाहेर निघतील याचा नेम नाही. भाडे मालकाला नेऊन द्यावे तर हा वाढीव दुरुस्तीखर्च कोठून उभा करायचा ही समस्या. ' मालकाला भाडे द्या. नाहीतर निकाल विरुद्ध लागेल ' हा वकीली सल्ला होता. चाळ समिती या मुद्यावर पार गांगरून गेली होती. पण चांगल्यामागे देव उभा असतो म्हणतात, तसा काहीसा अनुभव चाळकऱ्यांना आला. न्यायाधिशांनी सहानुभूतीने सर्व इतिहास ऐकून घेतला आणि चाळकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. म्हणजे नेमके काय झाले हे चाळसमितीचे लोक तपशीलात जाऊन मला सांगत होते. पण कंटाळल्यामुळे मी ते ऐकले न ऐकल्यासारखे करून सोडून दिले.

दिवसभर तुटकतुटक जी माहिती ऐकत होतो त्याचीच सभेच्या सुरुवातीला उजळणी झाली. जवळच्या दादर भागात राहणारे म्हणून प्रा. माधव मनोहर यांना कार्यकर्त्यांनी मुद्दाम बोलावले होते. त्यांना जायची घाई होती. तरी चाळीचा इतिहास ऐकून व तिचे नवे रूप पाहून ते थक्क झाले. उत्तरादाखल केलेल्या पाच मिनिटांच्या भाषणात ते इतकेच म्हणाले की, ' लेखक-पत्रकार मंडळींचे जे जे सहकार्य या कामासाठी कामगारबंधूंना लागेल त्यासाठी माझ्याकडे केव्हाही या. ' माधव मनोहरांनंतर शेजारच्या चाळीतील श्रीमती शांताबाई शिरोडकर बोलल्या. कमला कापड गिरणीत राहाटखात्यात त्या कामाला आहेत. त्यांच्या चाळीत आतापर्यंत सहा समित्या झाल्या. पण मतभेद, अविश्वास यामुळे कामच होऊ शकलेले नाही. चाळीची हलाखी वाढतच आहे. येथील संडास तर केवळ अस्वच्छच नाहीत, केव्हा एखाद्याचा बळी घेतील इतक्या मोडकळीच्या अवस्थेत आहेत. शेवटी या बाईंनी कंबर कसली. वर्गणी गोळा करणे सुरू आहे. खोजांच्या चाळीचे यश त्यांच्या मदतीला धावून आलेले आहे.

एच्. टी. जगताप हे असेच आणखी पलिकडच्या चाळीचे रहिवासी. ' सारा गिरणगाव मोडकळीस आलेला आहे. खोजाच्या चाळीने आदर्श निर्माण करून दिला आहे. जे सरकार करू शकले नाही, कार्पोरेशनने केले नाही ते आता कामगार स्वावलंबनाने करीत आहे. ' असे सांगून त्यांनी आपल्याही चाळीत दुरुस्तीची हालचाल सुरु करण्याचा निर्धार जाहीर करून टाकला.

चाळकऱ्यांना बांधकामात मदत-मार्गदर्शन करणारे श्री. गोर्डे यांनी खोजाच्या चाळीने आता सहकारी भांडार, मुलांच्या अभ्यासाची सोय अशी कार्ये यापुढे हाती घ्यावीत अशी सूचना केली.


सभाध्यक्ष श्री. हुले यांचा या भागाशी घनिष्ट संबंध आहे. गेल्या खेपेस ते या भागातून नगरपालिका प्रतिनिधी म्हणून निवडूनही दिले गेले होते. या विभागा-

साठी झोपडपट्टी निर्मूलन योजना लागू करण्याचा शासनाचा विचार चालू आहे ही माहिती देऊन त्यांनी या योजनेतील धोके स्पष्ट केले. बऱ्याच बिऱ्हाडकरूंना या जागेतून स्थलांतर करावे लागेल हा या योजनेतील मुख्य धोका आहे.

हे एक विधायक आंदोलन आहे आणि शक्यतो ते व्यापक व्हावे, समाजातील सर्व थरांची सहानुभूती, सहकार्य यासाठी मिळविण्याचा प्रयत्न व्हावा अशी माझी भूमिका मी मांडली. नेहमी होते असे, की कामगारांचे प्रश्न कामगारांनी मांडायचे त्यांनीच झगडायचे, इतरांनी तटस्थ राहायचे. फारतर प्रश्न अगदीच रस्त्यावर आला म्हणजे वृत्तपत्रातून उलटसुलट चर्चा करायची. यापेक्षा प्रथमपासूनच अशा मूलभूत प्रश्नासंबंधी वर्गनिरपेक्ष व्यापक सहानुभूतीची जाणीव निर्माण केली गेली, त्यादृष्टीने कार्यक्रमांची योजना झाली तर रस्ता आणि नैराश्य या दोन टोकांच्या पर्यायांपेक्षा एखादा तिसरा पर्यायही निघू शकतो. समाजातील इतर वर्ग आपले शत्रू आहेत ही भावना त्यासाठी सोडावी लागेल. कामगारबंधूंनी याचा विचार करावा, शोध घ्यावा, त्यांना सर्व वर्गातून मित्र मिळतील, कार्यकर्तेही लाभतील. अशी व्यापक एकजुटीची भावना हीच यापुढील लोक आंदोलनांची खरी दिशा आहे.

हे कार्य ' युनियन्स 'नी का करू नये असाही माझा एक प्रश्न होता. मला याचे समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. पगार-महागाईभत्ता याबाबत मिल मालकांशी, सरकारशी वाटाघाटी करणे, त्या फिसकटल्या तर एखाद्या संपाची घोषणा करणे एवढेच या युनियन्सनी आपले कार्यक्षेत्र मानले आहे काय ? मग अशा प्रकारच्या केवळ अर्थेकदृष्टी संघटनांकडून कामगारवर्गाला समाजवादाकडे वाटचाल करण्याचे बळ लाभेल ही शक्यता फार कमी आहे. भांडवलशाही समाजाची मूल्येच कामगारवर्गावर बिंबवण्याचे कार्य या संघटना करीत आहेत असे कां म्हणू नये ? दुपारी सहज मी चाळ समितीच्या कार्यकर्त्यांना विचारले : खोजाच्या चाळीचा मालक चाळ पडावी, त्याला तीनशे रुपये वाराप्रमाणे जागा विकता यावी यासाठी तुमचे हाल करतो. उद्या समजा चाळ सहकारी पद्धतीने तुमच्याच मालकीची झाली. तुम्ही काही वेगळा विचार कराल कां ? शक्य नाही. आपण सगळेच पैशाच्या मागे आहोत. पैसा हे आपल्या जीवनातील ' प्रधान मूल्य ' आहे. यालाच भांडवलशाही म्हणता येईल. हे मूल्य बदलल्याशिवाय भांडवलशाही व्यवस्था बदलू पाहाणे, तशा घोषणा–आरडाओरड करणे ही फसगत आहे–आपली व इतरांचीही. संपत्तीविषयक एक नवा दृष्टिकोन आपण सर्वांनी अंगिकारला पाहिजे. सर्व संपत्ती समाजाची आहे, व्यक्ति केवळ विश्वस्त आहे हा माझ्या मते समाजवादाचा मुख्य आशय आहे. आपल्यापैकी कितीजणांना हा आशय मान्य होईल ? व्यापक सहानुभूतीसाठी या आशयावर भर देऊन काम करणे अवश्य आहे असे मला वाटते.

माझा मुक्काम होता त्या खोलीला मोझेइक फरशी बसवण्यात आलेली होती.



**चेहरे : काही चाळीतील–काही बाहेरील**

सर्वश्री गोविंद महादेव हुले, मारुती अप्पा गायकवाड, वाळिंबे, श्री. ग. मा., पांडुरंग बाबुराव कदम, मारुती वेल्हेसे, शंकर शिंदे, सखाराम भोसरेकर, गणपत जावळे, किशोर तिवारी, तुकाराम पाष्टे, वासुदेव कदम, पांडुरंग केरकर, ज्योतिबा कुराडे, गोपाळ पवार, शंकर मोरे, रामकरण वर्मा, मनोहर शिर्के, धोंडिबा सकपाळ, राम आवध दुबे, गयादिन जयस्वाल, शिरपत शिंदे, जानबा केसरकर, रामभाऊ पडवेकर, रामकुमार मौर्य. डी. एस्. गोर्डे, श्रीमती शांताबाई शिरोडकर ……

**छायाचित्रे : द. ना. गव्हाणकर, मुंबई**

कंदील मागे पडून आता वीजबत्ती चमकत होती, पंखा गरगरत होता. या आतील सुधारणा ज्या त्या बिऱ्हाडकरूने आपापल्या कुवतीनुसार करून घेतलेल्या होत्या. बाहेरची मोकळी जागाही फरसबंद होणार आहे, चारा ऐवजी चौतीस संडास चालू करण्याची योजना आहे. चाळीवरील मंगलोरी कौले आजच जाणाऱ्या येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. लवकरच 'खोज्याची चाळ' हे जुने नावही जाईल आणि 'श्रमिकनगर' ह्या नावाची घोषणा समारंभपूर्वक करण्यात येईल. गिरणगावात खोज्याच्या चाळीने साधलेला हा पुरुषार्थ सध्याच एक चर्चेचा, कुतुहलाचा विषय आहे. ही चर्चा, हे कुतुहल वाढेल आणि अनुकरणाची एक प्रबळ ऊर्मी यातून निर्माण होईल अशी आशा मी आज बाळगून आहे.

**—श्री. ग. मा.**

# चलो सोमनाथ

# २

गेल्या वर्षाप्रमाणेच यंदाही सोमनाथला दुसरी अखिल भारतीय आन्तर-भारती श्रम-संकार छावणी आयोजित होत आहे.

परंतु या वेळी शिबिरार्थींना मुक्त प्रवेश नाही. त्यांच्या आवेदन-पत्रात दिल्या गेलेल्या माहितीनुसार त्यांची निवड केली जाईल. निवडीनंतर संयोजन समिती त्यांना स्वीकृति-पत्र पाठवील. स्वीकृति-पत्र घेऊन सर्वांनी यावे, अशी अपेक्षा राहील.

गेल्या वेळेपेक्षा या वर्षीच्या छावणीत श्रमकार्यात अधिक विविधता राहील. गेल्या वर्षी भातशेतीसाठी बांध घालण्याचे काम मुख्यतः झाले. या वर्षी नवीन जंगलतोड झालेल्या जमिनीला शेतीयोग्य बनवण्याच्या कामाव्यतिरिक्त या जमिनीच्या सिंचाईसाठी बांध, तलाव, विहीर आदींचे कामही योजले आहे. उत्पादित धान्य साठवण्यासाठी गुदाम बांधण्याची योजना आहे.

## संयोजन

छावणीतील संयोजनासाठी दैनंदिन कार्यक्रमांची चार प्रकारे विभागणी केली आहे. पहिले चार तास शारीरक श्रम, दुसरे तांत्रिक प्रशिक्षण, तिसरे बौद्धिक कार्यक्रम व शेवटी कला–मनोरंजन.

श्रमकार्याचे तास व दैनंदिन नित्यविधी यांच्याखेरीजचे छावणीचे सारे स्वरूप मोकळे राहील. छावणीत शिस्त असेल, पण ती स्वयंस्फूर्त रीतीने अधिक राहील. चित्रकला, संगीत, नाट्य अशा व्यक्तिगत छंदांना व कलाविष्कारासाठी अवसर राहील. बौद्धिक व तांत्रिक प्रशिक्षण यासारखे जे कार्यक्रम राहतील ते गेल्या छावणीप्रमाणेच ऐच्छिक, परंतु अधिक सुसंघटित असतील.

छावणी सुरू होण्यापूर्वी एक आठवडाभर ५० ते १०० निवडक युवक–युवतींची अग्रदल छावणी (पायोनियर्स कॅम्प) होईल. एक प्रकारे हे नेतृत्व-प्रशिक्षण शिबिरच होईल. यात पुढील छावणीची व्यवस्था व श्रम-प्रकल्पांचे प्रात्यक्षिक यांनी सुरुवात होईल.

हे अग्रदल शिबिर १४ मे ते २० मेपर्यंत चालेल. नंतर ता. २१ पासून मोठ्या छावणीची सुरुवात होईल व ती ता. ३१ अखेर चालेल. छावणीत येणाऱ्यांचे दोन वर्ग असतील. शिबिरार्थी व अतिथी. शिबिरार्थींना पूर्ण वेळ छावणीत राहणे आवश्यक

आहे. (त्यांच्यासाठी रेल्वे कन्सेशन मिळवण्याचा प्रयत्न चालू आहे.) अतिथींवर तसे बंधन राहणार नाही.

श्रमकार्याचे दोन प्रकार असतील : सामान्य व मजुरीवर आधारित. ज्यांची इच्छा असेल ते 'पीसवेज वर्क'च्या आधाराने श्रमकार्य करू शकतील. भोजन-मूल्य वजा करून त्यांना त्यांच्या कामाची मजुरी बाजारभावाने मिळेल (उदा.–१०० घनफूट (१०×१०×१) मातीचा बांध घालण्यास दोन रु. दहा पैसे)

छावणीत केवळ विद्यार्थी युवक–युवतीच नव्हेत, तर शेतीत व कारखान्यांत काम करणारे युवकही येऊ शकतात. त्यांचेही तेथे स्वागतच आहे. छावणीतील सर्व कामकाज मुख्यत: हिंदी व इंग्रजी या दोन्ही भाषांतून चालेल.

आवेदन-पत्रे १५ एप्रिल १९६९ पर्यंत संयोजकांकडे पोचावी.

अधिक माहितीसाठी–

**प्रा. दामोदर वेले–मुख्य संयोजक, आन्तर भारती श्रम-संस्कार छावणी, महिलाश्रम, वर्धा (महाराष्ट्र)**

## शिबिरार्थींसाठी आवश्यक माहिती

१. १४ ते ४० वर्षापर्यंतचे विद्यार्थी व श्रमिक युवक-युवती छावणीत येऊ शकतात. ज्यांचे वय ४० वर्षांहून अधिक आहे, परंतु जे शरीर व मनाने उत्साही आहेत तेही शिबिरात येऊ शकतात.

२. छावणी २१ मे १९६९ पासून सुरू होईल. २० मेच्या संध्याकाळपर्यंत छावणीत पोचणे आवश्यक आहे. ३१ मे १९६९ ला समारोप होईल.

३. सोमनाथ मूल–मारोड्यापासून पाच मैल आहे. सर्व शिबिरार्थींना चंद्रपूर (चांदा) येथे उतरून बसने मूलपर्यंत यावे लागेल. (संध्याकाळी एक बस चांद्याहून थेट सोमनाथपर्यंत येते). दिल्ली किंवा मद्रासच्या बाजूने येणाऱ्या शिबिरार्थींना चंद्रपूरला उतरावे लागेल. मात्र मुंबईकडून येणाऱ्यांना वर्ध्याला उतरून चंद्रपूरसाठी गाडी बदलावी लागेल. [ वर्ध्याला दक्षिणेस चंद्रपूर १२ वे स्टेशन आहे. ]

४. येण्या-जाण्याचा खर्च शिबिरार्थींना करावा लागेल. शिबिरात पूर्ण वेळ राहणाऱ्या शिबिरार्थींनाच रेल्वे सवलत मिळेल.

५. भोजन-व्यवस्था शिबिरामार्फत होईल. आपल्या जवळच्या सवयींमध्ये थोडा-फार बदल करण्याची तयारी ठेवावी लागेल. शिबिरार्थींकडून प्रतीकात्मक स्वरूपात एक किलो धान्य आणण्याची अपेक्षा ठेवली आहे.

६. कपड्यांचे दोन जोड, हाफ पॅन्ट, अंथरूण–पांघरुणासाठी आवश्यक वस्तू (उन्हाळ्याचे दिवस आहेत), ताट, वाटी, पेला किंवा तांब्या, टॉर्च या प्रकारच्या आवश्यक वस्तू आणाव्यात.

७. **शिबिराचा पत्ता** : आन्तर-भारती श्रम-संस्कार छावणी, मुक्काम सोमनाथ, पोस्ट–मारोडा. जि. चांदा, महाराष्ट्र. [ फो. नं. १०, मूल एक्स्चेंज ] ○

# सागरी साहस — यशस्वी सांगता !

लेफ्टनंट जॉर्ज ड्यूक आणि डॉक्टरेटचे विद्यार्थी श्री. पिनाकी चटर्जी ह्या दोन भारतीयांनी एका छोटयाशा होडीतून १ फेब्रुवारीला अंदमान गाठण्यासाठी कलकत्ता सोडले. उलटे वारे, खाद्यान्न व प्यायच्या पाण्याचा तुटवडा, प्रचंड देवमाशांचे सततचे भय वगैरे संकटांवर मात करून ह्या दोन साहसी वीरांनी, तब्बल तेहतीस दिवसांनंतर परवा ५ मार्चला अंदमान बेटांपैकी लँडफॉल बेट गाठले. तिथे थोडी विश्रांती घेऊन रविवारी ९ मार्चला संध्याकाळी ९ वाजता ते दोघे 'पोर्टब्लेअर' ह्या अंदमान बेटांच्या प्रमुख बंदरावर पोचले. तेव्हा ह्या एक हजार मैलांच्या सागरी साहसाच्या यशस्वी सांगतेचा महोत्सव साजरा करण्यासाठी हजारो अंदमानवासीय उत्स्फूर्तपणे बाहेर पडले. आणि ह्या वीरांचे त्यांनी स्वागत केले. लँडफॉल बेटावर ह्या वीरांनी भारताचा तिरंगी आणि त्यांच्या एक्स्प्लोरर्स क्लबचा ध्वज फडकावला, तेव्हा जमलेल्या शेकडोंनी टाळयांचा उत्स्फूर्त कडकडाट केला. ह्या तेहतीस दिवसांच्या प्रदीर्घ सफरीत, ह्या दोन वीरांना आणि त्यांच्या 'कान्होजी आंग्रे' बोटीला प्रचंड दिव्यातून जावे लागले. खाण्यापिण्याचे हाल होतेच, प्यायच्या पाण्याचा प्रश्न अधिकच बिकट होता. त्यांच्याजवळ असलेल्या रेडिओचे व प्रक्षेपण यंत्राचे कार्यही हवे तेवढे प्रभावी नव्हते व त्यामुळे त्यांचा जगाशी अनेक वेळा संपर्क तुटला होता. वाटेत दोनदा तर ते 'हरवले'च होते. आणि जवळ जवळ एकशेवीस तास त्यांच्याविषयीची कुठलीही बातमी मिळू न शकल्याने एकप्रकारच्या चिंतेचे सावट सर्व साहस–शौकिनांच्या चर्येवर पसरले होते. काहींनी असाही तर्क व्यक्तविला की, ते कदाचित् ब्रह्मदेशाच्या किनाऱ्याला लागले असावेत ! तब्बल १२० तासांनी जेव्हा त्यांना इतर जगाशी संपर्क साधणे जुळले व स्वतःच्या दिशेची खात्री करून घेता आली, तेव्हा त्यांना व भारत-अंदमानातून त्यांच्या बातमीकडे कान लावून बसणाऱ्यांना केवढे हायसे वाटले असावे ? ह्या साहसी सफरीचा वृत्तान्त ऐकून कोलंबस, वास्को–डी–गामा ह्यांसारख्या सागरी-साहसवीरांची आठवण न झाली तरच नवल ! भारतात तरी अशा तऱ्हेचा हा पहिलाच प्रयोग असावा, आणि भारतातल्या साहसवीरांच्या दृष्टीने तो एक महत्त्वाचा मार्गदर्शक प्रयोग ठरावा.

पाल्क सामुद्रधुनी पोहून विक्रम करणारे श्री. मिहीर सेन ह्यांच्या नेतृत्वाखालील 'एक्स्प्लोरर्स क्लब' ह्या संस्थेच्या विद्यमाने ह्या धाडसी सफरीचा कार्यक्रम आखला गेला होता. ह्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी, संस्थेच्या जवळ जवळ तीनशे सभासदांनी परवानगी मागितली होती. सर्वांची शारीरिक, मानसिक, वैद्यकीय चाचणी

[ पृष्ठ ६० वर

# मु क्ता फ ळे

। । । । ।

। । । । ।          । । । । ।

## □ राजकारणातले ‘ नारायण ’

संत कमी बोलतात. ते सहसा बोलत नाहीत. विनोबा संत आहेत. बोलले तर मोजके महत्त्वाचे बोलतात. परंतु महाराज मंडळींचे तसे नसते. ते सारखे बोलत असतात. ते तरुण असताना सारखे बोलले तरी हरकत नसते. कारण सर्व ‘ इंद्रिये ’ नीट काम देत असतात; व वाचाळपणाचा दोष सोडला तर ते बोलतात त्यातले ‘ कर्ता-कर्म-क्रियापद ’ तरी बरोबर असते. परंतु पुढे ही मंडळी म्हातारी होतात. इंद्रिये क्षीण होतात. नीट दिसत नाही. काही सहन होत नाही. अतिपरिचयामुळे फारसे कुणी विचारीत नाही. अर्थात सतत बोलणे हे आता हाडीमाशी खिळलेले असते. वर्तमानपत्रे त्यांचे बोलणे तरीही छापीत राहतात. त्यामुळे आपण पूर्वीसारखेच फार महत्त्वाचे बोलत आहोत, असे त्यांना वाटत राहते. ते दौरे काढतात म्हणून लोक थैल्या देतात. भारतात असे थैलीशहा खूप आहेत हे आपले भाग्य होय. टाळ्या वाजवणारा आपला देश सहसा कुणाच्या थैलीला विरोध करीत नाही. लोकांचा वेळ बरा जातो, शिवाय महाराजांचेही बरे चालते.

सर्वोदयी नारायणमहाराज तूर्त महाराष्ट्रात आलेले आहेत. आम्ही त्यांचे हार्दिक स्वागत करतो. यांना अगम्य असा एकही विषय नाही. शेख अब्दुल्लांचा हा महाराज आहे. जिनांप्रमाणे शेख अब्दुल्लाही सुदैवी आहेत. त्यांनाही महाराज मिळाले आहेत. काश्मीरच्या भूमीवर निर्वासितांचे पुनर्वसन केले तर रक्तपात घडेल, असे नुकतेच जाहीर करणारा शेख अब्दुल्ला मात्र मोकळा, आणि बाळ ठाकरे तुरुंगात का, याचा अचंबा काही जणांना वाटतो. आम्हांला वाटत नाही. बाळ ठाकरे यांनी नारायण-महाराजांचे प्रेम मिळवले नसल्याने त्यांना तुरुंगात टाकण्यात आलेले आहे. शेख

अब्दुल्लांची गोष्ट निराळी आहे. शेख अब्दुल्लांनी काश्मिरात स्वतंत्र काश्मीरचा घाट घालण्यासाठी परिषद बोलावली. उद्‌घाटनाला नारायण महाराज जातीने गेले होते. परिषदेचा एकंदर सूर व नूर तपासल्यावर पत्रकारांनी सुरतेला नारायण महाराजांना घेरले. विचारले – " महाराज, शेख अधिकच मस्तवाल झालेला दिसतो. अजून तुम्ही शेखचा पाठपुरावा करणार काय ?"

महाराज रागाने कडाडले – " चूक आहे ! अब्दुल्लांत बदल झालेला नाही हे म्हणणे साफ चूक आहे. काश्मिर खोऱ्यात अजून तो लोकप्रिय आहे. परिषदेच्या ठरावात स्वयंनिर्णयाचा आग्रह पूर्वीइतका नाही...हे दिसत नाही का ?"

" अहो, पण काश्मिरचे सामिलीकरण इररिव्होकेबल कंप्लीट...वगैरे असताना..." कुणी पत्रकार त्यांना छेडू लागताच नारायणमहाराजांनी त्याच्याकडे एक रागाचा कटाक्ष टाकला. तो गप्प झाला.

याच पत्रकार परिषदेत नारायण महाराजांनी सल्ला दिला – " जिल्ह्याच्या आकाराची राज्ये निर्माण केली पाहिजेत !" म्हणजे महाराष्ट्रात २६ राज्ये, २६ मुख्य मंत्री. प्रत्येक मंत्रिमंडळात साठ मंत्री. चाळीस उपमंत्री. खरोखर महाराजांची ही दृष्टी दिव्य होय. केवळ महाराष्ट्रात इतके मंत्री. अखिल भारतात...बुडाला फिरंग्या पापी ! उदंड जाहले मंत्री ।। असे ' आनंदभुवन ' निर्माण करणारी ही कल्पना कुणालाही आवडावी अशी नाही काय ? परंतु एका नतद्रष्ट पत्रकाराने महाराजांना विचारले –

" महाराज, नॅशनल इंटिग्रेशनचे मग काय होईल ?"

महाराजांनी एखाद्या मूर्खाकडे पाहावे तसे त्या पत्रकाराकडे पाहून म्हटले – " वत्सा, त्याची चिंता नको. फक्त आपल्याला अधिक जागरूकतेने प्रयत्न करावे लागतील !"

महाराज राजकारणात पडलेले नाहीत यावर आपण तरीही विश्वास ठेवला पाहिजे. महाराजांना पंडित नेहरू मंत्रिमंडळात बोलावीत असतानाही ते गेले नाहीत, याचे कारण मंत्रिमंडळात जाऊन मंत्री झाले तर त्यांना फक्त एकच ' खाते ' सांभाळावे लागेल. महाराज, शिक्षण खाते, काश्मिरचा प्रश्न, चीनविषयक धोरण, पाकिस्तानचा स्नेह, राष्ट्रीय एकात्मता, केंद्र-राज्य सरकारांचे संबंध, अशी नाना खाती सांभाळू इच्छितात. ' महाराज ' या भूमिकेतून हे शक्य आहे नाही का ?

महाराज तर्काने सर्व जाणतातच. परंतु इतरेजनांच्या तर्काला छेद देणारे विचार अधूनमधून व्यक्त करतात. दिल्लीला सांप्रदायिकता विरोधिनी समितीच्या दुसऱ्या अधिवेशनापूर्वी त्यांनी एक पत्रक काढले. त्यात म्हटले होते –

" मजलिस-ई-मुशावरत, अकाली दल, द्रविड मुन्नेत्र कळघम, शिवसेना, या सर्वांची वाढ रा. स्व. संघ व जनसंघ यांच्या वाढीच्या प्रमाणात झालेली आहे. देशाला या सर्वांपासून धोका आहे !"

याने काय झालंय? महाराजांनी जयपूरला सांगितले – "शिक्षण खाते सरकारी यंत्रणेतून काढून घेतले पाहिजे!" परंतु प्रश्न फक्त त्रिगुण सेन यांच्या बेकारीचा नाही. सरकारने शिक्षण खाते बंद केले, तर अर्थात महाराज ते खाते चालवतील, असा त्याचा अर्थ नाही. कारण नेमके मी काय करणार आहे, हे महाराज कधीही सांगत नाहीत.

बिहार प्रांतात धान्यांच्या किमती गडगडू लागल्याबरोबर महाराजांनी पाटण्याला सल्ला दिला – "बिहार सरकारने, प्रांताप्रांतांतील धान्य वाहतुकीवरील नियंत्रणे उठविण्यास केंद्र सरकारला भाग पाडावे!" आता मंडळी, तो हरिहरसिंग म्हातारा अजून ताठ उभा राहू शकत नाही...तो केंद्राशी काय लढणार? परंतु प्रश्न मुळी तो नाहीच. महाराजांची ती जबाबदारी नाही. ते सारखे बोलत राहणार...सल्ले देणार...पत्रके काढणार. नारायणराव गोरे यांच्या खालोखाल नारायण महाराज पत्रके काढतात, असा आमचा कयास आहे. कदाचित नारायण महाराज हे नारायणराव गोरे यांच्यापेक्षा अधिक पत्रके काढीत असतील. अभ्यासूंनी याचा 'वेध' घ्यावा. धन्य ते नारायण!

असा एकही विषय नाही की, त्या बाबतीत नारायण महाराजांनी जनतेला उपकृत केलेले नाही. "भारताचा इतिहास नव्याने लिहावा व या इतिहासात कसल्याही जातीयवादाला स्थान नसावे," असा आग्रह त्यांनी व्यक्त केला आहे. हे फारसे कठीण आहे असे आम्हांस वाटत नाही. शिवाजी-अफजुलखान भेटीचा प्रसंग विनोदी लेखकाच्या मदतीने असाच काहीतरी लिहावा लागेल :

अफझुलखान : महाराष्ट्रात दुष्काळ पडल्याचं ऐकतो!

शिवाजीमहाराज : काय सांगावं खानसाहेब! माणसं अन्न अन्न करीत फिरत आहेत. पोटं खपाटीला गेलेली स्त्रिया आणि अर्भकं...

[टीप : महाराज दुष्काळाचे वर्णन करीत असताना खानाची आतडी 'पिळवटून' बाहेर आली. याच घटनेचा विपर्यास करून – शिवाजीमहाराजांनी वाघनखे खुपसून खानाची आतडी बाहेर काढली असे काही इतिहासकारांनी म्हटले आहे.]

असो. थोडे विषयांतर झाले. परंतु नारायणमहाराजांना असा सुंदर गोड गोड इतिहास अभिप्रेत असावा; अर्थात हे क्षुद्र काम स्वतः महाराज करणार नाहीतच. इतिहासलेखकांनी काय करावे हे महाराज सांगतील.

असे हे थोर नारायण महाराज मुंबईला नुकतीच जी दंगल झाली तिची पाहणी करण्याकरिता धावत आले. 'मद्रास'ला दंगल झाली तेव्हा ते गेले नाहीत. कारण द्र. मु. कळघमपासून देशाला धोका असल्याने, धोकादायक ठिकाणी महाराज कसे बरे जातील?

"श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या बोलण्यावरून माझी जी समजूत झाली त्यापेक्षा खूपच निराळे मी इथे पाहत आहे..." असा बॉम्बगोळा दंगलग्रस्त भागातून फिर-

ताना महाराजांनी टाकला. श्री. चव्हाण यांनी शिवसेनेला फॅसिस्ट संघटना म्हटले याविषयी महाराज म्हणाले – " शिवसेनेची स्तुती वा निंदा करून काय होणार ? प्रश्न नैतिक आहे. नैतिक मूल्ये सर्वच क्षेत्रांत घसरली आहेत. "

आता नैतिक मूल्ये घसरली आहेत हे मुंबईला दंगलग्रस्त भाग प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कळले नव्हते काय ? परंतु धक्के देणे हे महाराजांचे तंत्र आहे. पत्रकार ' शिवसेने 'बद्दल प्रश्न विचारू लागताच महाराज म्हणाले –

" शिवसेनेपेक्षा जातीयवाद मला भयंकर वाटतो. हिंदू-राष्ट्राचा विचार फैलावत आहे हा मुख्य धोका आहे. रा. स्व. संघाचे दरवाजे सर्वांना उघडे असावेत. "

मुंबईच्या दंगलीची महाराजांची ही मीमांसा थक्क करणारी नाही काय ?

महाराजांविषयी एवढे सांगितल्यानंतर कुणाच्या मनात काही संशय राहू नये म्हणून हे सांगितले पाहिजे की महाराज दारूबंदीचे मोरारजीभाई इतकेच कट्टर पुरस्कर्ते आहेत.

आमची इच्छा एकच आहे, महाराजांचे पूर्वपुण्य लक्षात घेता महाराजांची प्रभा दिवसेंदिवस अशीच फाकत राहावी. लग्नकार्याप्रमाणे राजकारणातही असे ' नारायण ' लागतात. कार्याला यामुळे विशेष शोभा येते.

---

## □ चाणाक्ष – कामाक्ष

---

चार राज्यांत नुकत्याच मुदतपूर्व निवडणुका झाल्या. या चार राज्यांत मिळून काँग्रेसचे ५०१ आमदार होते. ही संख्या मुदतपूर्व निवडणुकीनंतर ४१९ झाली आहे. म्हणजे ८२ जागा फक्त काँग्रेसने गमावल्या आहेत. साधारणपणे ४ आमदारांचा एक लोकसभा मतदार संघ असतो. या दृष्टीने लोकसभेतील आणखी वीस–एकवीस जागा या घटकेलाच गमावल्यासारख्या आहेत...अशी काहीबाही तर्कटे रचून १९७२ साली केंद्रस्थानी काँग्रेस कोसळणार अशी भकिते काहींनी सुरू केली आहेत. जनतेत घबराट माजवणाऱ्या या कुडमुड्या ज्योतिषांचा आम्ही निषेध करतो. जर काँग्रेसला एखाद्या राज्यात पुरेसे आमदार नसले तर इतर पक्षांशी समझोता करून संमिश्र सरकारे बनवावी की नाही याविषयी काँग्रेसच्या थोर पुढाऱ्यांपैकी कुणाचे काय निश्चित मत आहे, हे सांगणे तूर्त कठीण झाले आहे. प्रसिद्ध झालेल्या मताप्रमाणे श्री. मोरारजी देसाई यांचे मत काँग्रेसने कोॲलिशन करावे असे आहे. श्री. निजलिंगप्पांचे मत निवडणुकांपूर्वी कोॲलिशन करू नये असे होते परंतु आता ते बदलले असल्याचे दिसते. श्रीमती इंदिरा गांधी यांनी अजून मत दिलेले नाही. स. का. पाटील यांना २५ वर्षे संमिश्र मंत्रिमंडळे हवी आहेत. श्री. चव्हाण यांचे अजून काही नक्की ठरलेले दिसत नाही. कामराज, अतुल्य घोष हे काही बोलण्याच्या मनःस्थितीत नाहीत. अशी एकंदर परिस्थिती आहे. पाटण्याला हरिहरसिंगांचा राज्यारोहण सोहळा आटोपून श्री. चव्हाण

दिल्लीला परतले. जनता पक्षाचे अध्वर्यू राजा कामाक्षनारायणसिंग हे दिनेशसिंगांचे साडू आहेत, अशी बोलवा आहे. तेव्हा दिनेशसिंगांनी त्यांना मंत्री होण्यासाठी मदत केली यात विशेष काही नाही. ते त्यांचे प्राप्तकर्तव्यच होते ! दिनेशसिंगांकरवी हे होताच, श्री. चव्हाण यांनी निजलिंगप्पांना इशारा दिला. निजलिंगप्पांनी हरिहरसिंगांना डोळा घातला.

रामगडचे ' चाणाक्ष ' राजे कामाक्षनारायणसिंग यांचा शपथविधी झाला. एकच कोलाहल माजला. श्री. सुब्रह्मण्यम यांनी कांगावा सुरू केला... " हा बेशरमपणा आहे. या कामाक्षनारायण सिंगाला सुप्रीम कोर्टाने एका प्रकरणात नुकत्याच चपराका दिलेल्या असताना त्यांना मंत्री करून कॉंग्रेसने अब्रू घालविली आहे..." असे तोंडाला येईल ते सी. सुब्रह्मण्यम् बोलत सुटले आहेत. आम्हांला हे कळत नाही की, हा काय पहिलाच बेशरमपणा आहे ? यापूर्वी कधी कॉंग्रेसची अब्रू गेलेलीच नाही काय ? हरिहरसिंगांना बिहार कॉंग्रेसचे नेतेपदी निवडून चव्हाण दिल्लीला परतले तेव्हा श्री. सुब्रह्मण्यम् का स्वस्थ बसले ? हरिहरसिंग व कामाक्षनारायणसिंग यांच्यांत फरक इतकाच आहे. हा दुसरा कोर्टांत गुन्हे शाबित झालेला गुन्हेगार आहे इतकेच. परंतु रामगढचे राजे हे राजा दिनेशसिंगांच्या नात्यातले आहेत ही जमेची बाजू नाही काय ? श्री. निजलिंगप्पांनी सी. सुब्रम्हण्यम् यांच्याकडे मुळीच लक्ष देऊ नये. राजीनामा तर देऊ नयेच. कारण मंत्रिपद हरवलेल्या सी. सुब्रह्मण्यम् यांचा, निजलिंगप्पांना ढकलून कॉंग्रेसचे अध्यक्षपद मिळविण्याच्या योजनेतला हा पहिला टप्पा असण्याची शक्यता आहे. सुब्रह्मण्यम् यांना हे माहीत आहे, की नैतिकता, प्रामाणिकपणा...यांची बडबड सुरू केली की लगेच त्याला कॉंग्रेसचा अध्यक्ष करतात. त्याला खुशाल बडबडू दे...निजलिंगप्पा, तुम्ही नका हो तिकडे लक्ष देऊ !

---

## ☐ टकलावरचा भांग

---

इंग्लंडचे युद्धकालीन पंतप्रधान विन्स्टन चर्चिल हे एकदा केशकर्तनालयात गेले. म्हणजे सलूनमध्ये गेले. ते खुर्चीत ठाकठीक बसताच न्हाव्याने विचारले—" साहेब, कुठची कट घेऊ ?" चर्चिल म्हणाले—" चहाटळपणा करू नकोस. कट घ्यायला डोक्यावर केस लागतात. काय करायचे ते लवकर कर ! " आम्हांला या गोष्टीची परवा आठवण झाली. पश्चिम बंगालमध्ये प्रजासमाजवादी पक्षाचे पाच आमदार तूर्त निवडून आलेले आहेत. यांतल्या चार जणांना पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरे यांनी पक्षातून हाकलून दिले. झपाट्याने टक्कल पडत असताना उरल्या सुरल्या केसांना असा कट मारणे सयुक्तिक ठरते काय ? का पक्ष चटकन बरखास्त करून मोकळा होण्याचा अध्यक्षांचा विचार आहे ?

—ग्यानबा

# राष्ट्रीय बियाणे महामंडळाची प्रगती

राष्ट्रीय बियाणे महामंडळाची स्थापना जुलै, १९६३ मध्ये झाली. जून १९६८ अखेर या संस्थेस पाच वर्षे पुरी झाली. या पाच वर्षांच्या काळात महामंडळाच्या कार्याची बरीच प्रगती झाली आहे. १९६३–६४ मध्ये या महामंडळाचा व्यवहार केवळ चार लाख रु. चा होता. तो १९६७–६८ मध्ये तीन कोटी रु. वर गेला. त्याचप्रमाणे १९६३–६४ मधील ९६ हजार रु. च्या तोटचावरून या महामंडळाने १९६७–६८ मध्ये २१ लाख ५६ हजार रु. च्या नफ्यापर्यंत मजल मारली आहे.

असे जरी असले तरी या महामंडळाचा कारभार अद्याप तांत्रिक दृष्टचा उत्तम रीतीने चालला आहे, असे म्हणता येत नाही. बियाणे उत्पादनाचा धंदा अतिशय गतिमान आहे. शास्त्राच्या प्रगतीमुळे नित्य नव्या सुधारलेल्या बियाण्यांची निर्मिती होत असते. या गतिमानतेची दखल महामंडळाने घेतली नाही, म्हणून त्याला काही विचित्र प्रश्नांस तोंड द्यावे लागत आहे. उदाहरणार्थ, संस्थेकडे आज ४३ लाख रु. चा बियाण्यांचा साठा शिल्लक आहे. नव्या बियाण्यांच्या प्रसारामुळे हा साठा निरुपयोगी ठरण्याचा संभव आहे. या बियाण्यांचा माणसांचे व जनावरांचे खाद्य म्हणूनही काही उपयोग नाही, कारण त्यांवर विषारी संस्करण केलेले असते. हा साठा जर नवीन बियाण्यांच्या स्पर्धेमुळे टाकून द्यावा लागला तर महामंडळाच्या नफ्याचे रूपांतर ताबडतोब तोटचात होऊ शकेल.

महामंडळावरील दुसरा आक्षेप म्हणजे त्याने तयार केलेल्या बियाण्यांची किंमत भरमसाट असते. या क्षेत्रातला आपल्या मक्तेदारीचा फायदा हे महामंडळ घेते. निर्यात-क्षेत्रातील आपला तोटा भरून काढण्यासाठी बियाण्यांच्या अंतर्गत किंमती वाढविण्याचा महामंडळाचा विचार आहे. असे झाले तर नव्याने गती घेत असलेल्या हरित-क्रांतीवर विपरीत परिणाम होईल.

महामंडळाच्या बियाणे-उत्पादनाची गेल्या तीन वर्षांची आकडेवारी खालील-प्रमाणे आहे. (आकडे क्विंटलचे)

| **बियाण्याचे नाव** | **१९६५–६६** | **१९६६–६७** | **१९६७–६८** |
|---|---|---|---|
| संकरित मका | १,०१२ | ९,२२२ | २५,२६८ |
| संकरित ज्वारी | ७४९ | ५,२४२ | १०,७९५ |
| संकरित बाजरी | १३३ | ४,३४३ | ३,५६६ |
| भात | ७३,००० | ३८,०७० | ३४,३७१ |
| भाजीपाला | २,६५९ | ५,७२५ | ५,५३४ |
| गहू | – | – | ५,९०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| संमिश्र मका | – | – | ४,९१२ |
| नाग | ७२ | ३७६ | ४२६ |

या आकडेवारीवरून महामंडळ संकरित मका व ज्वारी यांवर जास्त भर देत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तांदळाच्या बियाण्याचे उत्पादन दोन वर्षांमध्ये निम्म्यावर येऊन ठेपले आहे. त्याचप्रमाणे गव्हाच्या बियाण्याच्या निर्मितीचे जुजबी स्वरूप वरील तक्त्यावरूनच स्पष्ट होते.

आपल्याला अन्नप्रश्न सोडविण्यासाठी तांदूळ व गहू यांच्या उत्पादनात भरीव वाढ करावयाची आहे. असे असता या बियाण्यांच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष का ? मक्याचा बाजार (म्हैसूर, राजस्थान व महाराष्ट्र) अत्यंत नरम असताना संकरित मक्याचे एवढे स्तोम महामंडळ का माजवीत आहे ?

भाजीपाल्याच्या बियाण्यांच्या निर्मितीवर महामंडळाने वेळ व शक्ती का खर्ची टाकावी, हे गूढच आहे. कारण केंद्रीय अन्न व शेतकी मंत्रालयाने नुकतीच भाजी-पाला व फळफळावळ महामंडळाची स्थापना केली आहे. या संस्थेमार्फत भाजीपाला, फळफळावळ व फुलझाडे यांच्या बियाण्यांची निर्मिती होणारच आहे.

फुलझाडे व फळझाडे यांच्या बियाण्यांच्या व्यापारात नफा जास्त असतो, हे त्याचे कारण असावे. पण सार्वजनिक क्षेत्रातील एका मातब्बर संस्थेने नफ्याच्या मागे लागून आपले नैसर्गिक कार्य टाळावे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या कृत्रिम व नफेबाज कारभारामुळे बियाणे महामंडळाचे नफे भरमसाट फुगल्यास नवल ते काय? या नफ्याचा उपयोग इतर धान्यांची बियाणी जरा सवलतीच्या किंमतींत विकण्याकडे करणे सयुक्तिक ठरले असते. पण महामंडळ आपल्या कर्मचाऱ्यांना २० टक्के बोनस देण्याकडे या नफ्याचा विनियोग करीत आहे. कर्मचाऱ्यांना लाभ होऊ नये असे नव्हे पण तो लाभ मक्तेदारीतून निर्माण झालेला नसावा.

महामंडळाचे शासकीय खर्च कमी करण्याची अतिशय आवश्यकता आहे. देशभर पसरलेल्या बियाणे-प्लॉटस्‌च्या तपासणीसाठी फार खर्च येतो. महामंडळाच्या एकूण पगार-खर्चापैकी पंचवीस टक्के खर्च केवळ प्रवासभत्त्याचा आहे ! यावर उपाय म्हणजे अर्थातच लहान लहान बियाणे प्लॉट एकत्र करणे व बियाणे-ग्रामांची (सीड-व्हिलेजेस) प्रस्थापना करणे हा होय. या प्रचंड संस्थेत बियाण्यांचा उत्पादनखर्च अजमाविण्याची कसलीही यंत्रणा नाही. त्यामुळे बियाण्यांच्या किंमती कशा ठरविल्या जातात हे गूढ आहे.

नवनवीन सुधारलेली बियाणी वापरून शेतीउत्पादन वाढविणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांचा या महामंडळाच्या कामाशी घनिष्ठ संबंध आहे. शेतीचा उत्पादनखर्च अंशतः या महामंडळाच्या कारभारावरच ठरणार आहे. तेव्हा ठिकठिकाणच्या शेतकरी संघटनांनी या महामंडळाच्या कामात रस घेऊन ते गतिमान प्रगतीस उपकारक व सामाजिक दृष्ट्या इष्ट होईल, हे पाहण्याची गरज आहे. ○

समोर तीन भिती आहेत.

अगदी काळाकुट्ट... अमावस्येच्या घनघोर वादळी रात्रीसारख्या...

समोरच्या भितीला एक खिडकी... त्याच्याभोवती माश्यांची चित्रे... एक मला थोरला मासा लहान माश्याला गिळतो आहे. तो लहान मासा स्वत: गिळला जात असतानाच दुसऱ्या लहान माश्याला गिळतो आहे. दुसरा लहान मासा तिसऱ्याला गिळतो आहे... असे हे चक्र!

उजवीकडच्या भितीवर देऊळ, मशीद आणि चर्च... या साऱ्यांवर एक फडफडणारी ध्वजा... पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या खांद्यावर असते तशी... आणि या ध्वजेच्या टोकावर एक मानवी कवटी... दोन हाडांच्या सांध्यावर बसलेली... स्पिरिटच्या बाटलीवर किंवा विजेच्या खांबावर असलेल्या चित्रात असते तशी...

डावीकडच्या भितींवरही अशीच चित्रे... गिरणीचे, कुलुपाचे... त्यातच सूर्यमंडळातील ग्रहांच्या कक्षेसारखी अंडगोलाकृती वर्तुळांची एक आकृती... ही रांगोळीही असू शकेल... त्यावरही वारकऱ्यांच्या ध्वजा आणि कवटीचे चिन्ह...

साऱ्या मांगल्यावर, साऱ्या श्रमांवर, साऱ्या जीवनचक्रावरच जणू मृत्यूची मुद्रा उमटलेली आहे.

# काळे बेट

# लाल बत्ती

डावी भित जिथे वळते तिथे आणखी एक चित्र आहे. पंख पसरलेला गरुड आणि स्वस्तिक. ...हे तर नाझींचे बोधचिन्ह!

आणि उजव्या भितीच्या वळणावर कोवळ्या पानाफुलांची डहाळी चोचीत घेऊन उडणारे कबुतरांचे युग्म! ...अहिंसा, शांती आणि सहजीवनाचे प्रतीक.


मागच्या खिडकीतून दिसतो आहे एक लाल दिवा... हे धोक्याचे प्रतीक की वाहणाऱ्या आणि वाहवले जाणाऱ्या रक्ताचे निदर्शक? ...त्यावरची एक छोटीशी पाटी मात्र सांगते आहे... 'हा चंद्रलोकाकड जाण्याचा मार्ग आहे.'

– – – –

वसु भगत

– – – –

शिकारीत जास्तीत जास्त धोका असल्याशिवाय थ्रिल येत नाही.



मधुकर तोरडमल
सर इंद्रसेन आंग्रे

---

आणि या साऱ्यांच्या पलीकडे आकाश.

आकाश म्हणजे नुसता आभास ! खरा असणारा आणि तरीही खोटा असणारा ! आकाश म्हणजे अखेरीस हाती उरणारे विराट शून्य !

या भिंती आहेत एका अज्ञात काळ्या बेटावरील गढीमधल्या दिवाणखान्याच्या. ही गढी सर आंग्रे नावाच्या कोणा एका माणसाच्या मालकीची आहे.

या सर आंग्र्यांनी अमाप वाचले आहे. त्यांच्या ग्रंथालयात रामायण आहे. महाभारत आहे. उत्तररामचरित आहे. शेक्सपीअर आहे. अमाप वाचनाबरोबरच हा माणूस अमाप मद्यही पितो.

या माणसाची त्या काळ्या बेटावर सत्ता आहे. अगदी कर्तुमअकर्तुम् अन्यथा कर्तुम् अशी सत्ता. तो त्या बेटाचा अनभिषिक्त सम्राट आहे. तिथे त्याची हुक-

मत आहे. त्याची मर्जी हाच तिथला कायदा आहे. त्या बेटावरच्या जमातींतील माणसे दोन कोर भाकरीसाठी त्याच्या घरी त्याच्या मर्जीनुसार राबत असतात.

आणि तरीही हा माणूस हा एकटा आहे. एकाकी आहे. त्याच्या मनात विलक्षण पोकळी आहे.

हा माणूस आपल्या पूर्वजांनी त्या बेटावर दडवून ठेवलेला खजिना शोधून काढण्यासाठी त्या बेटावर येऊन राहिला आहे. कधीकाळी फुटलेल्या जहाजातून किनाऱ्यावर येऊन लागलेले दोन पुराणवस्तुशास्त्रज्ञ या कामासाठी तो राबवून घेत आहे.

पण, खजिना अद्याप सापडत नाही. त्याच्या मनाची पोकळी वाढते आहे.

ही पोकळी भरून काढण्याचा स्वतःपुरता एक मार्ग त्याने शोधून काढला आहे... शिकार ! ...ही शिकार वन्य श्वापदांची नाही. श्वापदांच्या शिकारीत त्याला रस नाही. कारण, श्वापदे बुद्धिमान नसतात. शिकारीच्या खेळात शिकार व शिकारी हे दोघेही तुल्यबल असले पाहिजेत. होणारी झुंज बरोबरीची असली पाहिजे, असे त्याला वाटते. कारण त्याशिवाय खेळात रंग चढत नाही. शिकारीच्या खेळात जास्तीत जास्त धोका असल्याशिवाय थ्रिल येत नाही.

म्हणून तो शिकार करीत असतो माणसाची ! माणसाच्या शिकारीत थ्रिल असते. विलक्षण उन्माद आणि आनंद असतो.

असा हा जगावेगळा माणूस ! आपल्या व्यक्तिमत्त्वाने आणि जीवनविषयक दृष्टिकोणाने थरारून सोडणारा, शब्दाशब्दागणिक अंगावर काटा उभा करणारा सर आंग्रे...

परवा शिवाजी मंदिरात हा माणूस भर दुपारी भेटला आणि खरे सांगतो, मी तर थरारूनच गेलो.

हा सर आंग्रे होता एका नाटकाचा नायक. हे नाटक सादर केले होते अहमदनगर कॉलेजच्या थिएटर ग्रुपने. नाटक लिहिले होते प्रा. मधुकर तोरडमल यांनी...

आणि नाटकाचे नाव होते ' काळे बेट लाल बत्ती. '

या काळ्या बेटाचे पहिले दर्शन होते ते एका अमावस्येच्या रात्री. त्या रात्री घनघोर वादळाने थैमान मांडले होते. पाऊस मुसळधारांनी कोसळत असावा, असे सारखे वाटत राहते. खिडकीतून दिसणाऱ्या लालबत्तीच्या मागच्या आकाशात कडाडणाऱ्या विजा लवलवत होत्या.

अशा या वादळात दूर समुद्रात बुडालेल्या जहाजातील सात माणसे लाईफ बोटीच्या आधाराने किनाऱ्याला येऊन लागली. ती किनाऱ्यावर पोहोचताच सर आंग्र्यांच्या नौकरांनी त्यांना अटक करून दोन कोठड्यांत डांबून ठेवले.

तीन दिवस आणि तीन रात्री ती सात माणसे दोन कोठड्यांत होती. त्यांना खायला अन्न देण्यात आले नव्हते. भुकेने सारी कावली होती. तडफडत होती. पण,

सरसाहेबांची मर्जी अजून प्रसन्न होत नव्हती.

तीन दिवसांनंतर अचानक सरसाहेबांची मर्जी पालटली. ती माणसे मुक्त झाली. सर आंग्र्यांचे सन्माननीय पाहुणे झाली.

तशी ही माणसे मुळातच सन्माननीय होती. भोपेशास्त्री विश्वेश्वराच्या देवालयाचे पिढिजात पुजारी होते. खाणे आणि झोपणे या दोन गोष्टींव्यतिरिक्त काहीही न करणारे आरामे पिढ्यान्‌पिढ्यांपासून चालत आलेली गर्भश्रीमंती उपभोगणारे होते. धान्याचा व्यापारी रणछोडदास उदार हाताने दानधर्म करणारा होता. सतत व्याख्याने देणारे वाचाळ कामगारांचे नेते होते. डॉक्टर अब्जबुद्धे विख्यात संशोधक होते. दशपुत्र्यांचा भारतीय औषधांचा कारखाना होता. जयश्री ही विदेशविद्याविभूषित युवती होती. साऱ्यांनाच समाजात मान होता. अब्रू होती. प्रतिष्ठा होती.

तरीदेखील सर इंद्रसेन आंग्रे नावाच्या क्रूर आणि दुष्ट माणसाने त्यांना तीन दिवस उपाशी ठेवले होते.. भुकेने ते व्याकुळ झाले होते. संपातले होते आणि तरीही, निदान घासभर तरी अन्न मिळावे म्हणून अगतिक होऊन, लाचार होऊन सर इंद्रसेन आंग्रे यांच्यापुढे शेपट्या हालवीत होती.

भुकेने त्यांना एवढे ग्रासून टाकले होते की, त्यांचे जीव वाचवून त्यांना सुखरूप किनाऱ्यावर पोचविणाऱ्या एका खलाश्याची आठवणही ते विसरले होते. सरसाहेबांनी करून दिली तेव्हाच त्यांना त्याचे स्मरण झाले. पण, आता उशीर झाला होता. त्या गरीब खलाशाचे स्मारक उभारायला सारे मोकळे झाले होते.

कारण, तो खलाशी मरण पावला होता. कुणीतरी गोळी घालून त्याला ठार मारले होते. आणि गोळी त्या खलाशाच्या दोन्ही भुवयांच्या अगदी मधोमध घुसलेली होती.

सर इंद्रसेन आंग्र्यांनी आपल्या बंदुकीने त्याची शिकार केली होती.

पण, त्यांची मानवी शिकारीची तृष्णा या शिकारीने भागली नाही. ती आणखी वाढली.

घरात आलेल्या सात पाहुण्यांनी आळीपाळीने आपल्याशी शिकारीचा खेळ खेळावा, अशी इच्छा सर आंग्र्यांनी व्यक्त केली, तेव्हा पुन्हा सुखावू लागलेली ही प्रतिष्ठित माणसे हादरतात. सर आंग्र्यांना विरोध करतात. पण, आंग्र्यांचा निश्चय कायम होता. तो बदलणे शक्य नव्हते.

खरे म्हणजे त्यांची खेळाची योजना मोठी सरळ होती. जो शिकार होईल त्याने आपले शस्त्र स्वतःच निवडायचे. तो जे शस्त्र निवडील तेच शस्त्र आंग्रेही घेणार होते. म्हणजे शिकारही शिकाऱ्यासारखीच सशस्त्र राहणार होती. तिलाही संधी साधून शिकाऱ्याला नेमके टिपता येणार होते.

पण, पाहुण्यांत तेवढा आत्मविश्वास नव्हता. स्वतःविषयी खात्री नव्हती. ते

आंग्र्यांवर चिडतात. संतापतात. त्याला पशू म्हणतात. राक्षस, सैतान म्हणतात.

पण, सर इंद्रसेन आंग्र्यांना शिकारीचा उन्मादक, थरारून सोडणारा, बेभान करणारा खेळ खेळायचाच आहे.

बिचारे पाहुणे ! ते लाचार होतात. अगतिक होतात. विक्षिप्त सरसाहेबांची करुणा भाकतात.

त्यांना आपल्यातल्याच एका जणाची शिकारीच्या खेळासाठी निवड करणे शक्य नसते.

मग आंग्रे स्वतःच मार्ग काढतात. जो सर्वांत वाईट असेल तो शिकारीच्या खेळातील पहिला भिडू.

पण, वाईट कोण आहे ? सारेच तर चांगले आहेत. पाप कुणीही केलेले नाही. सारे देशावर प्रेम करतात. मानवतेची काळजी वाहतात.

मग, आंग्रे आपली चूक दुरुस्त करतात. जो सर्वांत चांगला असेल तो शिकारीच्या खेळातील भिडू.

पण, आंग्रयांनी चूक दुरुस्त केली तर इतरांनी का करू नये ? त्यांच्यांत चांगले तरी कोण आहे ? सारेच वाईट आहेत. साऱ्यांनीच पापे केली आहेत. विश्वनाथाची पूजा करणाऱ्या भोपेशास्त्र्यांनी भोळ्याभाबड्या यात्रेकरूंना फसविले आहे. संपत्तीच्या लोभाने त्यांनी हत्येत भाग घेतला आहे. वाचाळांनी संप घडवून आणून हजारो मजुरांचे स्वार्थापायी हाल घडवून आणले आहेत. दशपुत्र्याने परदेशी औषधांच्या नकला करून लोकांना फसविले आहे. रणछोडदासने धान्यांत माती मिसळली आहे. अब्जबुद्धे लक्षावधी मानवांचा क्षणात संहार करू शकणारे अस्त्र शोधून मानवी विध्वंसनाच्या क्षेत्रात क्रांती करणार आहेत.

सारेच कसे स्वार्थी आहेत. आपमतलबी आहेत.

अखेर आंग्रे अब्जबुद्धयांची निवड करतात. शिकारीचा खेळ संध्याकाळी सुरु व्हायचा आहे.

तेवढ्यात डॉ. फडणीस नावाच्या पुराणवस्तुसंशोधकाला खजिन्याचा शोध लागल्याची बातमी येते. ही गोष्ट आंग्रयांच्या आयुष्यात मानवी शिकारीपेक्षाही अधिक आनंददायिनी आहे.

शिकारीचा खेळ त्या दिवशीपुरता स्थगित होतो.

पण, त्या क्षणानंतर साराच खेळ बदलतो.

कारण, सर इंद्रसेन आंग्रे यांना आनंददायिनी वाटणारी वार्ता खोटी ठरते.

डॉक्टर फडणीसांना आंग्रयांच्या खजिन्याचा शोध लागलेला नसतो. त्यांनी शोधून काढला असतो वेगळाच खजिना. त्यांना दोन हजार वर्षांपूर्वीचे काही पुरातन अवशेष सापडलेले असतात. सम्राट अशोकाच्या कोण्या धर्मप्रसारकाने कोरून ठेवलेले शिलालेख.

डॉक्टर फडणीसांची गरज संपली आहे. त्यांना आंग्रे यांचा खजिना सापडणार नाही, हे आता निश्चित झाले आहे. याचाच अर्थ असा की डॉक्टर फडणीसांची उपयुक्तता संपलेली आहे. त्यांनी जिवंत राहण्यात म्हणजेच त्यांना जिवंत ठेवण्यात स्वारस्य नाही.

पण, सर इंद्रसेन आंग्रे त्यांची शिकार करू शकत नाहीत. आंग्र्यांची माणसेही डॉक्टर फडणीसांना ठार मारू शकत नाहीत. कारण, आंग्र्यांनी त्यांना वचन दिलेले आहे की या बेटावर सर आंग्रे किंवा त्यांची माणसे यांच्याकडून डॉक्टर फडणीस व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्राणांना कोणत्याही प्रकारे धोका पोहोचणार नाही.

हा बुद्धिबळावरचा पेच आंग्रे मोठ्या सहजतेने सोडवितात.

त्यांच्या सात पाहुण्यांनी बोटीवर जाऊन डॉक्टर फडणीस व त्यांच्या सहकाऱ्यांची शिकार करायची.

पाहुणे याला तयार नाहीत. त्यांना कुणाचाही जीव घ्यावयाचा नाही. त्यांना फक्त आपला जीव वाचवायचा आहे. त्यांना फक्त आपल्या मायदेशी परत जावयाचे आहे.

आणि शास्त्रज्ञांची शिकार केली तर त्यांना आंग्रे सुखरूप मायदेशी पोहोचवून देणार आहेत.

दुसऱ्याच्या प्राणांपेक्षा आपले प्राण नेहमीच जास्त मोलाचे असतात.

डॉक्टर फडणीस व त्यांचा सहकारी यांची शिकार केल्याखेरीज कुणालाही आंग्र्यांच्या गढीतून बाहेर पडता येणार नव्हते. तेव्हा त्या दोघांची शिकार करणे भागच होते.

आरामे आणि जयश्री हे दोघेजण वगळून इतर पाचही जण सुरे परजीत बोटीवर गेले. डॉक्टर फडणीस व त्यांच्या सहकाऱ्याच्या शिकारीसाठी.

आता मात्र आरामे फणकारून उठतो. आतापर्यंत उठून बसणेही ज्याला कष्टप्रद वाटत होते तो आरामे सर इंद्रसेन आंग्र्यांना तळतळून जाब विचारतो. त्यांच्या दुष्टपणाचा. . .त्यांच्या क्रौर्याचा. एका निष्क्रिय माणसाने खवळून, तळतळून सैतानाला त्याच्या कृत्याचा विचारलेला जाब होता.

सैतानाला त्याच्या तडफडीमागचा प्रामाणिकपणा जाणवला असावा. कारण, सैतान चिडत नाही. संतापत नाही. आरामेला शासन करीत नाही.

उलट, त्याच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करतो.

कदाचित, आरामेने विचारलेला प्रश्न हा सैतानाच्याही पुढे उभा असलेला प्रश्न असावा.

कारण, तो जे उत्तर देतो त्यात उत्तर देण्यापेक्षा उत्तर शोधण्याचाच भाग जास्त असतो. ते त्याचे उत्तर नसते. त्या निमित्ताने त्याने केलेला तो प्रकट विचार

असतो...लाऊड थिंकिंग...

...क्रूरता, विध्वंसनाची वृत्ती ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. ती त्याच्या रक्तातच भिनली आहे. माणूस जन्माला आला तो क्रौर्य आणि विध्वंसनाची वृत्ती घेऊनच जन्माला आला. जीवनाचा प्रवाहच मुळी या वृत्तींनी बांधून ठेवला गेला आहे. जीवनाचे स्वरूप बदलले, प्रमेये बदललीत, मूल्ये बदललीत, त्यांचे उदात्तीकरण झाले, त्यांना विविध प्रकारची गोडगोंडस रूपे प्राप्त झाली; पण माणूस नाही बदलला. तो तसाच राहिला. जसा होता तसा. क्रूर आणि विध्वंसक. माणसाच्या रक्ताची तहान उरीपोटी बाळगणारा. भोवतालच्या अनुभवांनी सर इंद्रसेन आंग्रे यांना हेच दाखवून दिले आहे. सैतानाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या विक्षिप्त माणसाने कधी तरी जीवनाचा तळठाव घेण्याचा जीवाच्या आकांताने प्रयत्न केला होता. त्या वेळी त्याला उमगले ते हे विदारक वस्तुसत्य.

त्याच्या या प्रकट विचारांत काही ओळखीच्या जागा सापडतात. खूपखूप ओळखीच्या.... त्यात येणारा गांधीवधोत्तर दंगलींचा संदर्भ ... त्या वेळी झालेला विध्वंस ... सूडाच्या उग्र पण, क्षुद्र भावनांचा झालेला भेसूर, पाशवी उद्रेक..जिवंत माणसांना गादीत गुंडाळून जाळल्याची कथा ...

...त्या माणसांच्या मुद्रेवर आपला बाप मेल्याचे दुःख नव्हते, आरामे; होता तो विध्वंसाचा एक आसुरी आनंद. गादीत गुंडाळलेला माणूस प्राणांतिक यातनांनी किंचाळत होता आणि त्याच्या प्रत्येक किंकाळीबरोबर जाळणाऱ्यांना अधिकाधिक आनंद होत होता...

सैतान तत्त्वज्ञानी झाला होता. मानवी जीवनावर चरणारा व्रण त्याने उघडा करून दाखवला होता.

आणि त्याचा ताजा पुरावा...

तो पुरावा होऊनच भोपेशास्त्री आणि मंडळी दिवाणखान्याच्या दारातून आत शिरत होती. साऱ्यांच्या हातांतील सुरे रक्ताने माखले होते. त्यांच्या अंगावर, कपड्यांवर रक्त सांडले होते.

त्यांनी डॉक्टर फडणीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांची शिकार साधली होती.

त्या शिकारीने त्यांना विलक्षण आनंद प्राप्त करून दिला होता. त्यांनी विलक्षण उत्तेजकता, विलक्षण थ्रिल अनुभवले होते. आपण त्या दोघांना कसे कोंडीत पकडले, त्यांचे पोट कसे टरबुजासारखे टराटरा फाडले याच्या हकीकती ते मोठ्या अभिमानाने सांगत होते.

आणि त्याच क्षणी सर इंद्रसेन आंग्र्यांचे डोळे लकाकत होते. हा खेळ त्यांना एवढ्यात संपायला नको होता. या साऱ्याचा शेवट भव्यभीषण व्हायला हवा होता.

आणि मग त्यांनी त्या खेळाच्या भव्यभीषण सांगतेची कल्पना साऱ्यांसमोर मांडली.

मानवी शिकारीच्या रुद्रभीषण अनुभवाने बेभान झालेली ती सामान्य माणसे ती कल्पना कानांवर पडताच हादरून गेलीत. त्यांचे भान पुन्हा जाग्यावर आले. कारण, आता प्रश्न होता त्यांच्या स्वतःच्या प्राणांचा, स्वतःच्या अस्तित्वाचा.

सर इंद्रसेन आंग्र्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांनी हा शिकारीचा खेळ आपापसांत खेळायचा होता; आणि यातून जो शिल्लक उरणार होता त्याला आंग्र्यांच्या संपत्तीमधील अर्धी संपत्ती मिळणार होती. पाच कोटी रुपये.

ती सामान्य माणसे त्याला तयार नव्हती.

आणि त्यांना मोकळे सोडायला सर आंग्रे तयार नव्हते.

आंग्र्यांचा गार्ड हातात स्टेनगन घेऊन सज्ज होता. आंग्र्यांचा हुकूम होता-क्षणीच तो साऱ्यांना गोळ्या घालून कुत्र्यामांजरासारखा ठार मारणार होता.

असेही त्यांना मरावे लागणार होते आणि तसेही त्यांना मरावे लागणार होते.

पण, शिकारीच्या खेळात कुणीतरी एकजण जगण्याची शक्यता होती. त्याला पाच कोटी रुपये मिळणार होते. गार्डच्या गोळीने मरण्यापेक्षा शिकारीचा खेळ खेळणे अधिक सोयीचे होते. फायद्याचे होते.

आणि त्यांची शर्यत सुरू झाली.

पण, कामगार नेता वाचाळ हा त्या शर्यतीत सामील झाला नाही. त्याने स्वतः सरसाहेबांशीच शिकारीचा खेळ खेळण्याचा निर्णय घेतला होता. मरायचेच तर निदान सैतानाला मारण्याची धडपड करून मरायचे असे त्याने ठरविले होते.

वर्चस्वासाठी, इतरांना मारून जगण्यासाठी, चाललेली शर्यत जोरात सुरू झाली होती.

सर इंद्रसेन आंग्रे ती शर्यत पाहून हसत होते.

आणि वाचाळ हातातल्या सुरीच्या मुठीवरील पकड घट्ट करीत होता.

एक क्षण आला...

वाचाळने संधी साधली...

आणि त्याचा सुरा सर इंद्रसेन आंग्रे यांच्या पाठीत मुठीपर्यंत शिरला.

आंग्र्यांना मरणाचे दुःख नव्हते. त्यांना खंत होती ती पाठीत सुरा खुपसल्याची.

ते हसत जगले होते आणि मरतानाही हसणार होते.

म्हणून ते मरताना एक विनोद सांगतात. शर्यत जिंकून परत येणाऱ्यासाठी आरामेजवळ निरोप ठेवतात. त्यांच्याजवळ पाच कोटीच काय पण, पाच रुपयेसुद्धा नव्हते. खजिना त्यांना कधी सापडलाच नव्हता.

म्हणजे एवढे करूनही शेवटी उरले होते ते फक्त एक शून्यच !

पण, शून्य तरी कसं म्हणावे !

कारण, अजून एक गोष्ट उरली होती. डॉक्टर फडणीसांना सापडलेला शिलालेख. सम्राट अशोकाच्या कोणा अज्ञात धर्मप्रसारकाने दोन हजार वर्षांपूर्वी कोरून ठेवलेला...शांती आणि अहिंसेचा संदेश देणारा शिलालेख !

नाटक संपले.

सारे नाटक हा एक थरारून सोडणारा अनुभव होता.

मानवी मूल्ये तपासून पाहण्याचा, त्यांच्या मुळापर्यंत घेऊन जाण्याचा तो एक प्रयत्न होता.

वापरून वापरून सवंग झालेल्या आणि चलनी नाण्यांसारख्या गुळगुळीत झालेल्या शब्दांच्या गोंधळातून अस्सल वस्तुसत्य शोधण्याची ती धडपड होती.

मराठी रंगभूमीवर या आधी असे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. श्री. तेंडुलकर, श्री. जोशी आणि अगदी अगदी सुरुवातीच्या काळात श्री. दारव्हेकर यांनी जीवनातील वस्तुसत्याचा असाच शोध घेण्याचा प्रयत्न केला होता. या आणि अशा नाटककारांच्या यादीत प्रा. मधुकर तोडरमल यांचेही नाव आता दाखल करावे लागेल.

पण प्रा. मधुकर तोडरमल यांच्या या नाटकाने माझ्या मनात उपस्थित केलेले प्रश्न काही वेगळेच आहेत. ते प्रश्न आहेत लेखकाच्या 'अप्रोच'संबंधीचे...

सर इंद्रसेन आंग्रे ही व्यक्तिरेखा साऱ्या नाटकभर क्रूरतेचे, विध्वंसाच्या वृत्तीचे प्रतीक म्हणून वावरते. तिची हत्या वाचाळ याच्यासारख्या समाजनेत्याच्या हातून व्हावी, या घटनेचा अर्थही समजून घेता येतो. पण, प्रश्न उरतो तो असा की, क्रूरता आणि विध्वंसनाची वृत्ती या मानवाच्या सहजप्रवृत्ती किंवा मूळ प्रवृत्ती असतील तर त्यांची हत्या करणे, त्या नष्ट करणे, कसे शक्य आहे ? मूळ प्रवृत्ती संस्कारित करता येते; नष्ट करता येत नाही.

भोपेशास्त्री, वाचाळ, आरामे, रणछोडदास, दशपुत्रे किंवा अब्जबुद्धे ही सारी सामान्य माणसे आहेत. स्वतःचा जीव आणि स्वार्थ त्यांना प्यारा आहे. ज्या सहस्रावधी माणसांच्या जीवाशी ते खेळतात (आणि म्हणून ते क्रूर ठरतात.) ती सहस्रावधी माणसे स्वार्थी नसतात का ? त्यांना त्यांचा जीव प्रिय नसतो का ? मग तेही क्रूर का ठरू नयेत ? त्यांच्याविषयी क्रूरतेचे प्रतीक असलेल्या सर इंद्रसेन आंग्र्यांना एवढा कळवळा व सहानुभूती का वाटावी ? (प्रत्यक्ष नाटकात आंग्रे तसा कुठे उल्लेख करीत नाहीत. पण, त्यांना तसे म्हणायचे आहे, असे मात्र वाटत राहते.)

ही सामान्य माणसे मानवी शिकारीला सहजासहजी तयार होत नाहीत. सर इंद्रसेन आंग्रे प्रत्येक वेळी बंदुकीच्या धाकाखाली त्यांना तसे करावयास भाग पाडतात. क्रौर्य ही मूळ प्रवृत्ती असती तर असे घडले असते का ? ती माणसे शिकारीच्या खेळाला सहज तयार झाली नसती का ? पण, तसे घडत नाही. उलट, डॉक्टर फडणीस व त्यांच्या सहकाऱ्यांची शिकार करून आल्यानंतर वाचाळला एवढा उद्वेग येतो की तो शेवटच्या शर्यतीत भाग घेण्याला नकार देतो. पाच कोटी

रुपयांचे प्रलोभनही त्याला पुन्हा मानवी शिकारीचा खेळ खेळायला उद्युक्त करीत नाही. तो सर आंग्र्यांची हत्या करतो तीही क्रौर्याने प्रेरित होऊन नव्हे तर, क्रौर्याचा विनाश करायच्या सद्‌हेतूनेच ! आरामे तर कोणत्याच शिकारीत भाग घेत नाही. असे घडते, याचाच अर्थ, क्रौर्य व विध्वंसन या मानवाच्या मूळ प्रवृत्ती नाहीत, असा होत नाही का ?

मानवी जीवनाच्या शर्यतीचे फलित शून्य आहे, असा लेखकाने शेवटी निष्कर्ष काढला आहे. पण, त्याचबरोबर तो शांती आणि अहिंसेचा शिलालेख, बुद्ध आणि गांधींच्या पराजयाचे प्रतीक म्हणून, जपून ठेवायला तो शेवटी सांगतो. यात एक मूलभूत विरोध आहे. फलित जर शून्यच असेल तर पराजयाचीच काय, कसलीही प्रतीके जपून ठेवाण्याची गरज असू नये. कारण, पराजयाबरोबरच जयाचे फलितही निरर्थकच ठरणार नाही का ? जीवनाचे फलितच जर शून्य असेल तर जय-पराजय या कल्पनांना शून्याएवढासुद्धा अर्थ राहत नाही. त्यांनाच काय; पण, अस्तित्वाला, स्वार्थाला, जीव जपण्याला, मागून किंवा समोरून शिकार करण्याला... कशालाच अर्थ राहत नाही. लाल बत्तीखालच्या पाटीवर लिहिलेल्या... " हा मार्ग चंद्राकडे जातो " या स्वप्नविधानालासुद्धा.

पण तसे नाही. कारण, या मृत्यूच्या छायेतही दशपुत्रे आणि रणछोडदास यांना जयश्रीवर प्रेम करावेसे वाटते. जयश्रीला भीतीने ऊर पोखरला जात असतानाही आपल्या शीलाबद्दल अनुदार उद्‌गार काढलेले खपत नाहीत, मरण गळ्यापर्यंत येऊन पोहोचले तरी आरामेला भूक लागते, झोपावेसे वाटते, वाचाळ सरसाहेबांशी शिकारीचा खेळ खेळायला तयार होतो...का ? मृत्यूच्या मिठीतही ही माणसे अशी का वागतात ?

स्वतः प्रा. मधुकर तोडरमल यांनीच हे नाटक दिग्दर्शित केले आहे. तंत्रदृष्टया ते चोख आहे. किंबहुना दृष्ट लागावे इतके सुंदर आहे. त्यांची कॉंपोझिशन्स हा त्यांच्या दिग्दर्शन-कौशल्याचा अतिशय दृष्टिसुखद आणि उल्लेखनीय असा विशेष आहे. पण, त्यांच्या दिग्दर्शनाने मनात निर्माण झालेल्या दोन प्रश्नांची उत्तरे सापडत नाहीत, एक म्हणजे सर इद्रसेन आंग्रे ही व्यक्तिरेखा त्यांनी इतकी हिरॉइक, इतकी ग्लोरिफाय, का केली ? आणि दुसरे म्हणजे इतर व्यक्तिरेखा कॅरिकेचर्स का केल्या ? खरे म्हणजे हे दोन वेगवेगळे प्रश्न नाहीत. ते एकाच प्रश्नाचे परस्परावलंबी असे दोन भाग आहेत.

हे प्रश्न मनात उपस्थित झाले हा नाटकाचा दोष नाही. असलाच तर तो गुण आहे. ही नाटकाच्या यशाची पावती आहे. कारण, ते संपूनही संपले नाही. नाट्यगृहातून बाहेर पडल्यावरही मनात रेंगाळत राहिले. मन अस्वस्थ करीत राहिले.

चांगल्या कलाकृतीचा अनुभव याहून वेगळा थोडाच असतो !

O

"सारे जग श्वास रोखून बसेल"


असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या
झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा
# उदयास्त

वि. ग कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २.



# तिजा!

अनिल बळेल

**हो !** ती आता पुनश्च प्रेमात पडणार होती. आपणहून, किंवा तसे नाटक करणार होती. तिचा जो निश्चय झाला होता, तसे तिला करायलाच पाहिजे होते. एकटी वाटचाल आता तिला शक्य नव्हती. तिला संसार करायचा होता. घरकूल सजवायचे होते. चिल्यापिल्यांना घास भरवायचा होता. त्यांना

कावळा–चिमणीच्या गोष्टी सांगायच्या होत्या. आपल्या विश्वात दंग व्हायचे होते, जगाला विसरून! पण त्या खेळासाठी भिडू ह्या जगातलाच हवा होता ना! ह्यापूर्वी ती भिडू झाली होती, आता ती भिडू शोधणार होती.

चार वर्षांपूर्वी जेव्हा प्रथम ती ऑफिसमध्ये आली तेव्हा आजच्यापेक्षा कितीतरी वेगळी होती ती. नुकतीच मॅट्रिक होऊन शालेय विश्वाबाहेर पडली होती. जगाचे तर सोडाच पण घरातील व्यक्तीशिवाय इतरांचाही अनुभव तिने घेतलेला नव्हता. मॅट्रिकनंतर एक कोर्स घेतला असतानाच तिला परिस्थितीने नोकरी करण्यास भाग पाडले होते.

त्या लाजऱ्या–बुजऱ्या, मोजकेच बोलणाऱ्या पोरीवर तिचा सावळा वर्ण जमेस धरूनही ऑफिसमधील वसगडे तिच्या ट्रेनिंग पिरियडमध्येच खूष झाला, तिच्यावर फिदा झाला. आणि ह्या अजाण पोरीस त्याने ऑफिसमधील कामाच्या ट्रेनिंगबरोबर प्रेमाचेही ट्रेनिंग दिले. एवढेच नव्हे तर ट्रेनिंग संपल्यावर हेडक्लार्कला सांगून त्याने तिची आपली 'असिस्टंट' म्हणून नेमणूक होईल, अशी व्यवस्था करून घेतली. वसगडे चांगला कामाचा माणूस, त्याच्या हाताखाली ती चांगली तयार होईल, ह्या विचाराने साहेबाने त्याच्या म्हणण्याप्रमाणे तिची नेमणूक केलीही.

आणि खरोखरच वसगडेने तिला चांगली तयार केली–बनविली! ऑफिस रूटिनमध्ये ती तरबेज झालीच, पण इतर गोष्टींतही कलाकलाने बदल घडू लागला. साधेपणाची जागा भपक्याने जरी नाही घेतली, तरी विविधतेने घेतली. त्या विविधतेत प्रतीत होत होती तिच्यापेक्षा त्याची आवड! कळीचे फूल बनू लागले होते. त्याचा सुगंध जाणवू लागला होता. वसगडेच्या एखाद्या गुणावर भाळून म्हणा किंवा त्याने तिला ऑफिस रूटिनमध्ये तरबेज केले ह्या उपकारामुळे म्हणा, ती त्याच्या चांगलीच नादी लागली होती किंवा सदोदित तोच नजरेसमोर असल्याने सातत्याने मनच तसे तयार झाले होते.

ऑफिसमध्ये त्यांची टेबले शेजारी शेजारीच होती. त्यामुळे ऑफिसच्या वेळात ह्या चिमणा–चिमणीची सदैव चिवचिव चाललेली असायचीच. पण संध्याकाळी आपापल्या घरट्यांत परतण्यापूर्वीही त्यांचे कुठेतरी भ्रमण व्हावयाचेच. वेगवेगळ्या दिशांचे हे पक्षी लवकरच एका घरट्यात विसावणार असे वाटत असतानाच ते नुसते 'वाटणे'च राहिले.

त्यांनी एकमेकांना मनाने वरले होतेच. व्यवहारच काय तो राहिला होता. पण ते झाले नाही. लग्नाचा विषय निघताच दोघांच्याही घरांतून काडाडून विरोध झाला होता विजातीय म्हणून! विरोधास दोघेही तोंड देऊ शकले नाहीत. पळून जाऊन विवाहबद्ध व्हायचे तर पळून पळणार कुठे–पोटासाठी नोकरीने त्यांना बांधून ठेवले होते.

तिच्यावर आणखीन एक घाला पडला तो वसगडेच्या विवाहाने! त्याच्या

घरच्यांनी त्याच वर्षी त्याचा विवाह जुळवून आणला आणि बेडी बांधून टाकली. त्याने सर्व विसरून तिला विवाहास बोलविले पण ती गेली तर नाहीच, पण त्याच दिवशी शहाणपणाने तिने आपला 'सेक्शन' बदलून घेतला.

पण तिचा तो शहाणपणाच नडला. अनुभव आलेला असूनही ती सावरली नाही. मागील गोष्टींचीच पुनरावृत्ती झाली.

नव्या 'सेक्शन'मधील नव्या गोष्टी समजावून घेताना अजयच्या न् तिच्या बौद्धिक गप्पा सुरू झाल्या. अजय बुद्धीच्या बाबतीत नावाप्रमाणेच जय संपादलेला होता आणि तिला पदवी नव्हती तरी तिची बुद्धी 'तेज' होती. त्यामुळेच त्याने तर तिला भारावून टाकलेच पण पूर्वपीठिका माहिती असूनही अजय तिच्यावर भाळला. स्वतः वसगडेने त्याला एकदा त्याबद्दल छेडले. 'पण झालं तें भूतकाळात जमा झालं. वर्तमान आमच्या हातात आहे न् भविष्याची आम्हांला फिकीर नाही' असे अजयने त्याला साजेसेच उत्तर दिले.

भविष्यकाळाचीच नव्हे तर आजूबाजूचीही फिकीर न करता हे 'बौद्धिक प्रेम' चालू राहिले. परंतु अजयने आपल्या घरी त्याची काहीच कल्पना दिली नाही. त्यामुळेच त्याने एकदम लग्नाचा विषय काढताच आईने त्याला निक्षून 'नाही' म्हटले. कारण आई अजयच्या लहानपणीच वचनबद्ध झाली होती. अजयला मामे-बहिणीशी लग्न करणे भाग होते. आजयला ह्याची थोडीशी कल्पना होती पण प्रेमाच्या धुंदीत त्याने तिकडे कानाडोळा केला. 'निभावून नेऊ' म्हटले. पण त्याच्या-च्याने निभावले गेले नाही. वृद्ध आईच्या मनाविरुद्ध वागावयास त्याला धीर होईना. बंड करू पाहणाऱ्या त्याच्या मनाने मामेबहिणीशी तिची तुलना करून पाहिली. आणि मामेबहीणही काही 'डावी' नाही असा निर्णय घेऊन टाकला. परिस्थितीशी त्याने आपली कुंडली जुळवून घेतली. तिच्या कुंडलीतील सारे ग्रह मात्र मंगळावर जाऊन बसले. अवघ्या चार वर्षांत तिला दुसऱ्यांदा आघात सोसावा लागला होता.

त्या आघातातून ती उठली ती काहीशा निश्चयानेच! आता ती पूर्ण बदलली होती. वसगडेच्या विवाहास गेली नव्हती पण अजयच्या विवाहास आवर्जून गेली होती. इतरांसारखीच विवाह समारंभात वावरली. आपली व्यथा पुसटशीदेखील दर्शविली नाही. जणू कधी काळी ती अजयची नव्हतीच अशी वागली. तेथून परत-ताना मात्र तिने विचार केला की प्रेमात आपलीच आहुती का म्हणून? प्रेमाच्या खेळात आता आपण बाद व्हायचे नाही तर दुसऱ्याला जिंकून घ्यायचे. विवाहबद्ध व्हायचे.

इजा-बिजात ती सापडली होती, फसली होती, होरपळून निघाली होती. तरीही आता ती शोधत होती-तिजा!

O

# झुंड

## ३

१९५०-५१ मध्ये भारताबरोबर लढाई करण्याची पाकिस्तानची तयारी नव्हती.
पाकिस्तानला तेवढी ताकद नव्हती. पाकिस्तान वाष्कळ वल्गना तर एकीकडे खूप करीत होते. भारताविरुद्ध विषारी फुत्कार टाकीत होते, पण त्याचे स्वरूप ' नाही देखिले पंचानना, तोवरी जंबूक करी गर्जना ' या स्वरूपाचे होते. पाकिस्तान आतून समजून होते की अपुऱ्या तयारीनिशी भारताशी लढणे म्हणजे मरणाला आमंत्रणच. पळता भुई थोडी होईल ..आणि म्हणूनच पाकिस्तानने प्रथम तयारी सुरू केली. त्या तयारीचे पहिले पाऊल म्हणून १९५३ मध्ये पाकिस्तानने अमेरिकेबरोबर परस्परमैत्रीचा करार केला. आणि अमेरिकेच्या आधिपत्याखाली असलेल्या सीटो आणि सेन्टो गोटांत पाकिस्तान सामील झाले. पाकिस्तान आता पश्चिमी राष्ट्रांच्या पूर्ण आहारी गेले होते, फक्त भारतद्वेष हा उद्देश डोळ्यांपुढे ठेवून. भारताच्या दृष्टीने हे अरिष्ट होते. भारताला ती आगाऊ, धोकादायक, गंभीर पूर्वसूचना होती. दि. १३ नोव्हेंबर १९५३ ला पंडित नेहरूंनी (नेहमीप्रमाणे !) अमेरिकेला ' कडक निषेध खलिता ' पाठवला. आणि अमेरिकेला गंभीर इशारा (!) दिला की, ' अमेरिकेची पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत हे अमेरिकेचे कृत्य भारत-अमेरिका यांच्या मैत्रीविरुद्ध मानले जाईल. ' (Unfriendly Act) पंडित नेहरूंनी भारताच्या लोकसभेत भाषण करताना अमेरिकेकडून पाकिस्तानला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या मदतीबाबत तीव्र शब्दांत नापसंती व्यक्त केली. पंडितजी म्हणाले, " या मदतीमुळे वसाहतवाद वाढीस लागेल आणि आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात

| | | | | | | | | | | | | | | | | लेखक

ब्रिगेडियर
जे. पी.
दळवी

| | | | | | | | | | | | | | | | अनुवाद

ॲडव्होकेट
माधव
कानिटकर

येईल." जानेवारी १९५४ मध्ये पंडितजींना असे वाटत होते की, या पाकिस्तानला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या मदतीमुळे तिसरे महायुद्ध जवळ येईल आणि त्याची सुरुवात भारताच्या सरहद्दीलगतच होईल.

अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट जॉन फॉस्टर डल्लेस यांच्यावर पंडितजींच्या या शब्दजंजाळाचा काहीही परिणाम झाला नाही. प्रत्येक जिवंत व्यक्तीच नव्हे तर प्रत्येक जिवंत राष्ट्रदेखील आपापला स्वार्थ बघत असते. मग कुणी कितीही सुंदर भाषण करो. अमेरिकेच्या हिताच्या दृष्टीने अमेरिकेने त्यांचे काम चालूच ठेवले. पाकिस्तानला मदत दिली. कारण रशियाला व पर्यायाने कम्युनिझमला पायबंद घालण्यासाठी पश्चिमी राष्ट्रांनी आपसांत संरक्षक करारांचे जाळे निर्माण केले पाहिजे या तत्त्वाचे जॉन फॉस्टर डल्लेस हे मूळ जनक होते. रशियाला पायबंद घालण्यासाठी पाकिस्तानची ताकद वाढवली पाहिजे, वेळ पडली तर रशियाशी लढताना अमेरिकेला पाकिस्तानच्या सरहद्दीतच सोयीच्या दृष्टीने अमेरिकन सैन्य उतरवावे लागेल हा अमेरिकेचा विचार. तर कुठल्याही हेतूने का होईना शस्त्रे द्या, भारताविरुद्ध ती उपयोगी पडतील हा पाकिस्तानचा विचार.

रशियावर दाब आणण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानची दोस्ती हे महत्त्वाचे 'ठिकाण' म्हणून हवी होती. अमेरिका स्वतःच्याच हितासाठी पाकिस्तानला मदत देत होती. मग भले पंडित नेहरू काहीही म्हणोत. दुर्बळांच्या शब्दाला किंमत ती किती द्यायची ? आता हे जगजाहीरच झाले आहे की रशियन प्रदेशावर हेरगिरी

करणारे अमेरिकेचे यू–२ हे विमान रशियावर उड्डाण करण्यापूर्वी सुटले होते ते पाकिस्तानच्या पेशावर विमानतळावरून. या विमानाने तेल–पाणी घेतले ते पाकिस्तानात. रशियाने पाकिस्तानला सज्जड दम दिला की, 'पुढच्या वेळी अमेरिकेचं असं विमान तुमच्या विमानतळावरून जर का सुटलं तर याद राखा. आम्ही इथं बसल्या बसल्या तुमचा पेशावर विमानतळ उद्ध्वस्त करून टाकू.' आणि आपण काय केले ? आपण फक्त अमेरिकेला 'कडक निषेध खलिता' पाठवला आणि स्वस्थ बसलो.

—— असे म्हणतात की अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर यांनी पाकिस्तान-प्रमाणेच भारतालादेखील शस्त्रास्त्रपुरवठा करण्याची तयारी दाखवली होती. पण पंडित नेहरूंनी अमेरिकेची ही सिद्धता तुच्छ लेखली. नाकारली. किती झाले तरी भारत हे एक शांतताप्रिय, तटस्थ राष्ट्र होते ना ! जगाच्या कुठल्याच गटात सामील होणे, शस्त्रे घेणे बरे नव्हे. फार फार तर काय होईल ? आपल्याच देशाची हजारो मैल लांबीची भूमी गमवावी लागेल. पण तटस्थता आणि शांतता अधिक महत्त्वाची. शिवाय ही मदत नाकारून भारताने जगाची अशी गैरसमजूत करून दिली की भारत हे एक स्वयंपूर्ण (!), स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र आहे.

१९५४ हे वर्ष भारताला आणिबाणीचे होते. अमेरिकेकडून मिळालेले पॅटन रणगाडे, एफ्–८६ फायटर विमाने, रडार, पैसे, अद्ययावत बंदुका, मशिनगन्स या प्रचंड मदतीमुळे पाकिस्तानी सैन्यात थोडा जीव आला. पाकिस्तानची शेपटी पुन्हा वळवळ करू लागली. केवळ पंजाब नव्हे वेळप्रसंगी दिल्लीपर्यंत धडक मारण्याची पाकिस्तानची तयारी सुरू झाली. कारण पाकिस्तानची आता अशी खात्री पटली होती की, कुठल्याही परिस्थितीत आता भारत-पाकिस्तान यांच्यांतल्या लढाईचा निर्णय पूर्वीप्रमाणे एकतर्फी होणार नाही. फक्त भारताचाच नेहमीप्रमाणे विजय होणार नाही. भारताला आता पाकिस्तानबरोबर लढणे भारी पडेल.

राजकीय पातळीवरून काश्मीर प्रश्न युनोमध्ये सोडवणे इथून पुढे शक्यच नव्हते. पश्चिमी राष्ट्रांना त्यांचा नवा 'दोस्त' पाकिस्तान याला खूष ठेवणे भागच होते. पण रशिया तेवढाच बिलंदर. वेळप्रसंगी 'व्हेटो' वापरून रशिया स्वतःच्याच फायद्यासाठी भारताची तळी उचलून धरीत होता. प्रश्न आमचा. 'सोडवत' (?) होते भलतेच. काश्मीर प्रश्न 'युनो'मध्ये लोंबकळत पडला. आपल्या नेत्यांना 'काश्मीर प्रश्न' युनोमध्ये नेण्यापूर्वीच ही दूरदृष्टी हवी होती. आंतरराष्ट्रीय शांतता आणि तटस्थता या अवास्तव कल्पना उराशी बाळगून भारतीय नेत्यांनी एका गोष्टी-कडे संपूर्ण दुर्लक्ष केले की आपण लढाई चुकवू शकणार नाही, युद्ध फक्त आपल्या इच्छेवर अवलंबून नाही. आपण कुणाच्या मुस्कटात देत नाही याचा अर्थ आपल्या कुणी देणारच नाही असा नव्हे. दुर्बलांच्या शांततेला जगात कुणी कुत्रा विचारत नाही. ज्याच्या हातात तलवार त्याचे राज्य. आपली लष्करी तयारी नेहमीच मज-

बूत पाहिजे. आधी ताकद आणि मग शांतता.

आपला त्या वेळी असा अंदाज होता की, सैन्याची पुनर्रचना करायला, लष्करी तयारी करायला पाकिस्तानला कमीत कमी तीन वर्षे लागतील. त्याच वेळी हेही सर्वांना ठाऊक होते की, पाकिस्तानचे शेकडो फौजी आणि हवाई दल अधिकाऱ्यांना आधुनिक युद्ध-तंत्राचे शिक्षण खुद्द अमेरिकेतच दिले जात आहे. अमेरिका आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांची अशी खात्री होती की, पंडित नेहरू त्यांच्या हयातीत कधी 'पाकिस्तानवर आक्रमण करा!' असा हुकूम भारतीय सैन्याला देणे शक्य नाही. तयारी करायला भरपूर वेळ आहे. अमेरिकन मदतीमुळे पाकिस्तानी फौजा आणि त्यांची तथाकथित आझाद कश्मीर फौज आता चांगलीच प्रबळ झाली होती. पाकिस्तानची आता अशी खात्री पटली होती की, सद्य:स्थितीत भारतीय सेना आता पाकिस्तानकडे फक्त तुच्छतेच्या किंवा धिक्काराच्या भावनेने पाहू शकणार नाही. भारी पडेल.

भारत आणि पाकिस्तान यांच्यांतली लष्करी ताकद अशी विजोड झाली होती. भारताला धोका होता. कुठल्याही क्षणी पश्चिमेकडून किंवा उत्तरेकडून आक्रमण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. भारतीय सेनेच्या जनरल स्टाफला पुन्हा एकदा भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने फेरविचार करावा लागला. भारतीय सेनेच्या अधिकाऱ्यांनी पाकिस्तानची वाढलेली ताकद लक्षात घेऊन आपल्या स्थितीचे सविस्तर गुणदोष विवेचन करून आपल्या अपरिहार्य अशा कमीत कमी (!) मागण्या सरकारला सादर केल्या. सरकारने हजार बयादी लावल्या. नेहमीप्रमाणे वेळ काढला. वादविवाद केला. भारत सरकारचा, भारतीय सेनाधिकाऱ्यांच्या—त्यांच्या स्वत:साठी नव्हे तर देशासाठी आवश्यक असणाऱ्या—कमीत कमी मागण्यांकडे बघण्याचा दृष्टिकोण हा असा होता. नशीब एवढेच की त्यानंतर का होईना पण मर्यादित स्वरूपाची (!) (Modest Re-organisation) सैन्याची पुनर्रचना करायची भारत सरकारने सेनाधिकाऱ्यांना परवानगी दिली. P. W. D. च्या अकौंटंटने एखाद्या व्हाऊचरला बऱ्याच काळानंतर सँक्शन द्यावे तशा भारतीय सेनेच्या कमीत कमी मागण्या सँक्शन झाल्या. नशीब ते तरी झाले. नाहीतर १९६५ च्या पाकिस्तानबरोबर झालेल्या लढाईत आपली दाणादाणच उडाली असती. सैन्याची ताकद वाढवली तर भारतीय सेना काय करू शकते हे आपल्या जवानांनी पुन्हा एकदा दाखवून दिले. १९६५ च्या लढाईत भारताने पाकिस्तानच्या अमेरिकन मदतीपैकी 'पॅटन' रणगाड्यांचा अक्षरश: खिमा केला. 'पॅटन' हा शब्द उच्चारला की जगातले लोक कुत्सित हसतात. कुणाची बहाद्दुरी होती ती? आपल्या छोट्या नॅट विमानांनी अपूर्व पराक्रम गाजवला. "छोटी चीज बडे काम की होती है!" ह्या स्वर्गीय लालबहाद्दूर शास्त्रींच्या वाक्याचा खरा अर्थ किती जणांना खऱ्या अर्थाने कळला असेल?

१९६५ च्या लढाईत भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा 'याद रख ! आमच्याशी गाठ आहे !' या धर्तीचा तडाखा दिला.

...आणि एवढे असून यामागे विनोद असा की, सन्याचो ताकद थोऽऽऽडी वाढवा, अशी परवानगी देतानादेखील भारत सरकारच्या सूचना अशा होत्या की, "मात्र एक लक्षात ठेवा, आपल्याला पाकिस्तानवरोवर शस्त्रास्त्रस्पर्धा करायची नाही." का ? कारण "लक्षात ठेवा, आपल्याला अमेरिकेच्या प्रत्यक्ष राष्ट्राध्यक्षांनी असा शब्द दिलाय, की अमेरिकेकडून पाकिस्तानला देण्यात आलेली अद्ययावत शस्त्रास्त्रे आणि रणगाडे अमेरिका पाकिस्तानला भारताविरुद्ध वापरू देणार नाही !" कशाकरिता दिला होता अमेरिकेने हा साळसूद 'शब्द'? फक्त भारताला तात्पुरते शांत करण्यासाठी. कुणी विचारच करायला तयार नव्हते की, अमेरिकेकडून मिळवलेले पॅटन रणगाडे आणि सुपरसॉनिक विमाने पाकिस्तान काय चीनविरुद्ध किंवा रशियाविरुद्ध वापरील ? आहे तेवढा दम पाकिस्तानमध्ये ? कधी होता तर आता येणार ? हे धरून चालायला हवे होते की पाकिस्तान ही सामग्री वापरेल ती फक्त भारताविरुद्धच. काश्मीर प्रश्नावर. भारत सरकार आणि राज्य करणारे काँग्रेसचे नेते यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या या अजब शब्दांवर विश्वास ठेवला. काय हा वेडेपणा ! अमेरिकेकडून मिळालेली शस्त्रास्त्रे आणि विमाने पाकिस्तानने एप्रिल १९६५ मध्ये कच्छच्या रणात भारताविरुद्ध वापरली आणि सप्टेंबर १९६५ मध्ये जम्मू आणि काश्मीरच्या छांब विभागात आणि पंजाबमध्ये वापरली. हे असे नक्की होईल एवढी 'डोकी' आम्हांला होती ! सर्वसाधारण सुशिक्षित भारतीय माणसाची सैनिकांकडे बघण्याची भावना ही असते की 'काय करणार ? आमचा मुलगा शाळेत दरवर्षी नापास व्हायला लागला तेव्हा त्याला शेवटचा मार्ग म्हणून म्हटले, आता सैन्यात तरी जा !' तरीही 'डोकी' आम्हांला होती. नव्हती ती नेत्यांना. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन पाकिस्तानला असे विचारू शकले नाहीत की, 'अमेरिकन मदत भारताविरुद्ध का वापरलीत ?'

त्याच वेळी भारताला दुसरी अशी आशा होती की, अमेरिकेने पाकिस्तानला एवढी मदत का दिलेली आहे हे न समजण्याइतका रशिया बिनडोक नाही. उडत्या पाखरांची पिसे मोजणारी माणसे आहेत ती. अमेरिकन मदतीने पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले तर ? तर ते अमेरिकेचे रशियावरच आक्रमण आहे असे समजून रशिया मध्ये पडेल. पश्चिमी राष्ट्रांचे रशियाविरुद्ध जाळे, ही डल्लेस यांची कल्पना प्रत्यक्ष अंमलात येऊ देण्याइतका रशिया मूर्ख नाही. रशिया स्वस्थ बसणार नाही, अशी आपली आशा होती. पण रशिया स्वस्थ बसला. का ? कारण, रशियाच्या आणि भारताच्या सीमा एकमेकांना लागून नव्हत्या म्हणून. याचा अर्थ एवढाच की परकीय राष्ट्रांची खोटी आश्वासने आणि खोटी राजकीय वचने यांवर विसंबून राहणे ही भारताची त्या वेळची नॅशनल पॉलिसी होती.

एवढ्यावरच भागले ? अगदी अलीकडे १९६८ मध्ये रशियाने पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवण्याचे ठरवले. ज्या रशियावर आपला पाकिस्तानविरुद्ध भरवसा तो रशिया पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवतो. नशीब एवढेच की, भारतातल्या जागृत संघटना, सावध लोकमत आणि जबाबदार नेते यांच्यांत संतापाची लाट उसळली. सरकार जागृत झाले. पण ते तेवढ्यापुरतेच. कारण पुन्हा सर्व काही शांत झाले. पुन्हा एकदा भारत सरकार आणि रशियन नेते भारतीय जनतेला फक्त 'आश्वासन' देत आहेत. एका पिढीच्याच कालखंडात भारत आपली दोनदा फसवणूक करून घेईल, अशीच नियतीची योजना आहे की काय ?

१९५४–५५ मध्ये पंडित नेहरू भारत आणि चीन यांच्यांतल्या २००० वर्षांपासून चालत आलेल्या सांस्कृतिक संबंधांची आणि मैत्रीची वाखाणणी करीत होते, आणि त्याच वेळी भारताच्या अक्साई–चीन प्रदेशात भारतावर आक्रमण करण्याच्या निश्चित हेतूने चीन मोठमोठे रस्ते बांधून काढीत होता. सप्टेंबर १९५७ मध्ये खुद्द चीननेच जाहीर केले की, 'अक्साई–चीनमध्ये बांधलेला आमचा रस्ता आता वाहतुकीसाठी खुला करणार आहोत, मोठमोठी गुपिते जगापासून लपवून ठेवणाऱ्या चीनने हे साळसूदपणे का जाहीर केले ? अक्साई–चीन हा प्रदेश जर का त्यांचा (!) होता, रस्ता जर का त्यांचा होता तर ते जाहीर करण्याची जरुरीच काय होती ? पण चिन्यांना ते जाहीर करण्याची जरुरी वाटली. कारण त्यांना ठाऊक होते की भारत सरकारला चीनने अक्साई–चीन प्रदेशात फार मोठा रस्ता बांधला आहे हे अजून ठाऊकदेखील नाही. ही आपली सरहद्दीवरची टेहळणी. तेव्हा भारत सरकारला जे अजून ठाऊक नाही, ते त्यांना ठाऊक करून दिलेलेच बरे. बघू, काय भारत सरकार करते ते ! नाहीतरी आता आपल्या रस्त्याचे काम पूर्ण झालेच आहे. हा हेतू त्यामागे होता.

ज्या वेळी आपल्या प्रदेशात चीनने रस्ता बांधला आहे हे भारत सरकारला चीनकडून कळले तेव्हा आपण आपले टेहळणी पथक सरहद्दीवर पाठवले. बैल गेला आणि झोपा केला. या आपल्या टेहेळणी पथकाला चिन्यांनी अटक केली. का ? विनापरवाना चीनच्या हद्दीत आले म्हणून. त्यांचे म्हणणे असे होते की हा भू–भागदेखील चीनचा. कशावरून ? कारण तिथून चीनने बांधलेला रस्ता जातो. पंडित नेहरूंना हे ठाऊक असून त्यांनी लोकसभेला यातली काहीही माहिती दिली नाही. या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आणि देशाला कमीपणा आणणाऱ्या घटना पंतप्रधान या नात्याने लोकसभेला सांगणे हे आपले कर्तव्य आहे असे त्या वेळी त्यांना वाटले नाही. विरोधी पक्ष आता मात्र थोडे जागे झाले होते. त्यांनी या बाबतीत खडसावून विचारणा केल्यानंतर पंडितजींनी मोठे मासलेवाईक उत्तर दिले. पंडित नेहरूंनी लोकसभेत सांगितले, "अशी कुठलीच खास घटना आतापर्यंत घडली नव्हती की ज्यामुळे सर्व माहिती लोकसभेत सांगावी. आम्ही

असा विचार केला की, या बाबतीत चीनशी पत्रव्यवहार करून आपण काही प्रगती करू शकू आणि ज्या वेळी वेळ येईल तेव्हाच लोकसभेला सर्व माहिती देऊ!"

१९५४–५५ मध्ये आपल्या देशातले राजकीय वातावरण हे असे होते. राजकारणी नेत्यांना बाकीचे महत्त्वाचे विषय पुष्कळ होते. सैन्य आणि सरहद्दीचे संरक्षण हे दोनच विषय सर्वांत कमी महत्त्वाचे. सैन्याचे काम इतकेच होते की त्यांनी दुय्यम दर्जाच्या सेनेबरोबर लढण्याची तयारी ठेवून देशाच्या संरक्षणाची तयारी ठेवावी. कुठली ही दुय्यम दर्जाची सेना? पाकिस्तानी? बहुधा पाकिस्तानी सेनाच. अमेरिकेकडून तांत्रिक शिक्षण, रणगाडे, विमाने, अद्ययावत् रायफल्स् मिळाल्यानंतर पाकिस्तानचे सैन्यबल दुय्यम दर्जाचे राहणार होते? भारतीय सेनेची रचना, घडण आणि ताकद यांच्या संदर्भात 'दुय्यम–दर्जाची सेना' याची व्याख्या तरी सरकारने काय केली होती?

भारताच्या सरहद्दीवर घडणारे किरकोळ प्रसंग आणि घटना यांवर लक्ष ठेवणे हीच त्या वेळी भारतीय सेनेची प्रमुख कामगिरी होती. पाकिस्तानकडून कमीत कमी १९५७ साल उजाडेपर्यंत आक्रमण होण्याची शक्यता नाही हा आपला अंदाज होता. तोपर्यंत भारतीय सैन्य पाकिस्तानचा समाचार घ्यायला समर्थ होते. चीन तर आपला मित्रच. तो कसे बरे आक्रमण करील? चक्क लिहूनच दिलायन ना चीनने पंचशील करारात, की आम्ही तुमच्यावर आक्रमण करणार नाही म्हणून. आणखी काय पाहिजे? भारत सरकार त्या वेळी अशा समजुतीखाली होते की एक तर इतक्या नजीकच्या भविष्यकाळात युद्ध होत नाही. मग कशाला करा त्याचा विचार? कशाला सैन्याबाबत योजना? शत्रास्त्रांसाठी खर्च? आजच काही आपल्याला कोणी फाशी देत नाही. तूर्त काम काय? शांतता! अजून काही वर्षे चिंता नको. तोपर्यंत फावल्या वेळात 'नवभारताची उभारणी', 'पंचवार्षिक योजना' 'धरणे बांधणे,' 'उदघाटने करणे', 'समाजवादी भारत' वगैरे अत्यंत महत्त्वाचे विषय आहेतच!

सैन्याचा–जवानांचा–सर्वांनाच त्या वेळी विसर पडला होता. 'जय जवान–जय किसान' ही घोषणा अगदी अलीकडची. भारतीय जवानांनी पाकिस्तानबरोबर झालेल्या लढाईत अपूर्व पराक्रम गाजवल्यानंतर. तोपर्यंत कुठल्याही राष्ट्रीय घोषवाक्यात 'जवान' नव्हताच 'किसान'च भरपूर होता! त्या वेळी आमची आठवण कुणालाच नव्हती, आमच्या बंदुका थंड होत्या! नवीन शिक्षण दिले जात नव्हते. सैन्यावर जास्त खर्च करायची सरकारची इच्छा नव्हती. नवीन अद्ययावत शस्त्रसामग्री आपल्याकडे नव्हती. निर्माण केली जात नव्हती, की विकत घेतली जात नव्हती. स्वातंत्र्य मिळाल्यावर १९४७ साली भारतीय सेनेजवळ जी शस्त्रे होती तीच १९५४–५५ पर्यंत फक्त आपण जतन करीत होतो. दुसऱ्या महायुद्धात वापरलेली शस्त्रास्त्रे आपण तिसरे महायुद्ध जवळ आले तरी वापरणार होतो. मग

जगातल्या इतर राष्ट्रांनी कितीही सामर्थ्यसंपन्न होऊन राहावे. आपण व्हायचे नाही, आपण फक्त जागतिक शांततेसाठी प्रयत्न करीत राहायचे.

१९४७ ते १९५५ ही महत्त्वाची ८ वर्षे आपण अक्षरश: फुकट घालवली. लढाईची तयारी, योजना, सैन्यात वाढ यांपैकी काहीही केले नाही. भारताच्या राजकीय नेत्यांचे देशाच्या संरक्षणाबाबतचे विचार असे भ्रामक आणि म्हणूनच धोकादायक होते. चीन आपला मित्र आहे हा त्यांचा विश्वास होता. मैत्री करावी पण मित्र ओळखावा असे म्हणतात ते काय उगाच ? चीन आपला मित्र आहे म्हणून आपण लष्करी दृष्ट्या सज्ज व्हायचे नाही ही काय सबब झाली ?

वादापुरते असेही धरून चालू की राजकीय नेत्यांचे अंदाज खरे ठरले असते तरी काय झाले ? चीन आपला मित्र असेल पण म्हणून आपले सैन्य आपल्याला वाढवायला नको ? अद्ययावत् शस्त्रास्त्रांनी सुसज्ज करायचे नाही ? जवानांना नवीन शिक्षण द्यायचेच नाही ? करण्यासारखे खूप होते, वेळ होता, पण काही केले नाही. वेळीच सेनेची ताकद वाढवली असती, योजना आखल्या असत्या, जरा कडक भाषेत बोललो असतो, लढाई होणारच हे धरून चाललो असतो तर चित्र वेगळे दिसले असते. चीनला आपण दमदार भाषेत सुनावू शकलो असतो की, बाबारे ! आमचा मित्र आहेस ! पण तुमचे आमचे 'प्रेम' आहे तितकेच राहू दे. फार जवळून नको आणि तसा काही अविचार केलासच तर तुला लांब हाकलावा लागेल. आमची जय्यत तयारी आहे. पण असे झाले नाही. अगदी प्रामाणिकपणे बोलायचे झाले तर त्या काळात आपले तथाकथित मंत्री 'बुद्दू' च होते. दूरदृष्टीचा त्यांच्या ठिकाणी अभाव होता. शेजारच्या राष्ट्रांच्या हालचालींवर कुणाचे लक्ष नव्हते, डोक्याला (?) त्रास होत नव्हता. तेवढी बुद्धिमत्ता आणि लायकी मंत्री म्हणवून घेणाऱ्या कुणामध्ये त्या वेळी होती ? सैन्याला योग्य ते अधिकार आणि योग्य ते हुकूम दिले जात नव्हते. दुसरे महायुद्ध आणि काश्मीरचे रणांगण अशा ठिकाणी पराक्रम गाजवणाऱ्या भारतीय सैन्याची 'युद्धाची खुमखुमी' पद्धतशीर रीत्या हळूहळू कमी केली जात होती की जी कायम ठेवणे हे सरकारचे कर्तव्य होते. निकाली कुस्तीचा दिवस फार लांब असला तरीदेखील 'पैलवान' दररोज आखाड्यात कुणाला तरी लोळवायचा प्रयत्न करतो तो निकाली कुस्ती त्याला जिंकायची असते म्हणून. आपण हे केले नाही. आपण निष्क्रिय राहिलो. शांतता ! शांतता !

...... नंतर अगदी उशीरा १९५९ मध्ये काही योजना घाईघाईत हाती घेण्यात आल्या. नुसती घाई करून, गडबडीने योजना आखून लढाई जिंकली जात नसते. लढण्यासाठी हातात बंदूक घेण्यापूर्वी लढाई डोक्यात शिरावी लागते. लढाईसाठी पूर्वतयारी लागते, काही काळ लागतो. आणि नंतर सरकारलादेखील हे कबूल करणे भाग पडले. भारताचे त्या वेळचे संरक्षणमंत्री मा. यशवंतराव चव्हाण अगदी अलीकडे म्हणाले की 'लढाईच्या पूर्वतयारीसाठी सैन्याला नुसत्या पैशांचीच जरुरी

नसते. त्यासाठी त्यांना काही काळही लागतो!'

पण हे समजायला आता फार उशीर झाला होता. फारच उशीर झाला होता.

आपल्या सैन्याच्या हालचाली अशा तऱ्हेने सरकारी मतप्रवाहावरोबर कुठच्या कुठे वाहत जात होत्या. आपल्या देशाचे भवितव्य हे परकीयांनी दिलेल्या शब्दावर, आर्थिक टंचाईवर आणि शेजारच्या देशांकडून होत असलेल्या हालचालींवरच्या दुर्लक्षावर अवलंबून होते. पुढचा मागचा विचार करून भारतीय सेना प्रबळ कशी करता येईल याचा विचारच करायला कुणी तयार नव्हते. राष्ट्रीय विचार अंमलात आणण्याकरिता सैन्याची मदत लागते हे कुणाच्या मनातदेखील येत नव्हते. आपल्या सरहद्दीच्या संरक्षणाचा विचार गंभीरपणे कुणी करीतच नव्हता. या देशाचा इतिहासाचा बारकाईने अभ्यास केला तर एक गोष्ट सहज लक्षात येईल की, भारताच्या राज्यकर्त्यांनी अनेक शतकांपासून सरहद्दीकडे दुर्लक्ष केलेले आहे. तुम्हांला आश्चर्य वाटेल, चमत्कारिक वाटेल पण इतिहास नीट वाचा. ज्या ज्या लढाया आत्तापर्यंत हिन्दुस्थानचे तथा भारताचे राज्यकर्ते लढले त्या सर्व आपल्या सरहद्दीच्या आत शत्रू येईल अशी खात्री बाळगून. तयारीत असणे किंवा त्याला बाहेरच्या बाहेर पिटाळणे याचे नावच नको. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू याला अपवाद नव्हते. ते नेहमीच्याच 'राज्यकर्त्यां'च्या मार्गाने जात होते. भारताच्या सरहद्दींचे संरक्षण हा प्रश्न ते सगळ्यात कमी महत्त्वाचा समजत होते! शत्रू आत घुसलाच तर भारताचे भवितव्य काय, याचा विचार ते करीत नव्हते.

भारत आणि पाकिस्तान या दोघांना मान्य होईल अशा तऱ्हेने काश्मीर प्रश्न 'युनो' सोडवू शकत नव्हता. सुरक्षा समितीच्या चर्चांना काही अर्थच नव्हता. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र अशा त्या चर्चा. आम्हा लष्करी अधिकाऱ्यांना अशी खात्री होती की, पाकिस्तान काहीतरी निमित्त करून युद्ध सुरू करील आणि काश्मीर प्रश्नावर भारताला तडजोड करणे भाग पाडील. कारण लढाई म्हटली की पंडित नेहरू तडजोड स्वीकारतात—मग ती कितीही अपमानास्पद असेना—हे पाकिस्तानला ठाऊक होते. पण नशीब आपले की आमचे अंदाज खोटे ठरले. उगाच नव्हे! पाकिस्तानने नक्कीच युद्ध सुरू केले असते पण पश्चिम पाकिस्तानात त्या वेळी अशांतता माजली होती. तो काळ युद्ध सुरू करण्याच्या दृष्टीने पाकिस्तानला अयोग्य होता. पण अमेरिकन शस्त्रास्त्र मदत मिळाल्यावरोबर पाकिस्तान ताजेतवाने झाले. पाकिस्तानने अन्तर्गत झगडे लष्करी बळावर तात्पुरते मिटवले आणि लोकांचे लक्ष भलतीकडेच जावे म्हणून भारताबरोबर गडबड सुरू केली.

प्रथम कच्छच्या रणामध्ये आणि नंतर एप्रिल १९६५ मध्ये पंजाबच्या फिरोजपूर सरहद्दीवरील हुसेनीवाला येथे भारताला पाकिस्तानबरोबर उखळी तोफा वापरून जबरदस्त सामना द्यावा लागला. दोन्ही बाजूंनी रक्त उसळून यावे असे वातावरण निर्माण झाले.

या वेळीदेखील पाकिस्तानला मोठ्या प्रमाणांत युद्ध नको होते. सरहद्दीवर प्रक्षोभक प्रकार घडवून आणण्याचा पाकिस्तानचा उद्देश एवढाच होता की भारताची लष्करी तयारी कितपत आहे हे तरी बघू या. पण प्रत्येक वेळी पाकिस्तानने मार खाल्ला. आपण हे दाखवून दिले की ' उगाच गडबड करू नका. भारी पडेल. ' आमची अशी खात्री पटली होती की पाकिस्तानपासून आपल्याला म्हणण्यासारखी काळजी नाही. काही जास्त तयारी नसतानादेखील आपण पाकिस्तानला केव्हाही रट्टा मारू शकतो. मग जास्त तयारी केली तर काय होईल ? जगाच्या नकाशात पाकिस्तान राहणार नाही. फक्त त्यांनी आपण होऊन आपली कुरापत काढायचीच खोटी.

१९५६ नंतर चीनने भारताबरोबरच्या खोट्या मैत्रीचा पडदा दूर करायला सुरुवात केली. वरवर पाहता मैत्री टिकवण्याची भाषा बोलता बोलता चीनने स्पष्ट शब्दांत लडाख व नेफामधील भारताच्या प्रदेशावर हक्क सांगितला. वर चीन असेही म्हणत होता की हा प्रश्न भारताबरोबर वाटाघाटी करून शांततेच्या मार्गाने सोडवावा अशी चीनची इच्छा आहे. जो मुळात ' प्रश्न 'च नव्हता तो आधी प्रश्न झाला आणि चीन तो वाटाघाटीने सोडवणार. १९५८ मध्ये चीनने चिनी प्रदेशाचे नवीन नकाशे छापले त्यात भारताची प्रचंड भूमी ' चिनी प्रदेश ' म्हणून स्पष्ट दाखवली होती. भारताने खडसावून विचारले, ' हे काय ? ही जमीन तुमची केव्हा झाली ? ही तर आमची आहे ! ' त्यावर चाऊ–ऐन् लायने साळसूद उत्तर दिले, " रागावू नका ! हे नकाशे म्हणजे जुन्या नकाशांचे पुर्नमुद्रण आहे. आणि आमच्या नव्या चिनी सरकारला त्यात दुरुस्त्या करायला वेळच नव्हता. चुकून तुमचा भू–भाग आमचा म्हणून दाखवला गेला. " पण जाता जाता चीनचे


लिटक्विझ १५ भाषेंत १८० एजन्टस् २५५ पत्रांत जाहिरात

क्र. ४८ रु. ५०,०००

प्रवेश पत्रिका रविवारच्या नवशक्तित पाहा

लिटक्विझ विकली मोफत मागवा.

लिटक्विझ प्रायव्हेट लि., मुंबई-७

पंतप्रधान चाऊ–एन्–लाय यांनी त्यांची अभद्र वाणी पूर्ण केली. ते पुढे म्हणाले, 'ते काही का असे ना ! एकदा भारत आणि चीन यांच्या सीमारेषा ठरवून घेतल्या पाहिजेत. त्या अजून नीट मोजमाप करून ठरलेल्या नाहीत.'

काय म्हणायचे याला ? सरकारला हा इशारा नव्हता ? तरीदेखील आपले सरकार काहीही करायला तयार नव्हते.

आपल्या देशाच्या अक्साई–चीन प्रदेशात लडाखमध्ये चीनने फार मोठा रस्ता बांधून काढला आहे, ही बातमी आता गुप्त राहिली नव्हती. एका चिनी 'चित्रमय जगत्' धर्तीच्या मासिकाने या रस्त्याचा फोटोच छापून तो प्रसिद्ध केला. 'हिन्दी–चिनी भाई भाई'चे युग अशा तऱ्हेने हळूहळू नाहीसे होत चालले होते. मांजराच्या पिलाचे डोळे उघडायला २१ दिवस लागतात. भारत सरकारचे डोळे उघडायला त्याहून जास्त काळ लागला. या काळातच भारत आणि चीन यांचे पंतप्रधान अनेकदा भेटले. त्यांनी सरहद्दीच्या प्रश्नाची अनेकदा आपसात चर्चा केली. पण रामा, शिवा, गोविंदा. निकाल लागत नव्हता. आणि असे असून १९५४ च्या पंचशील कराराचा फायदा फक्त चीन उठवीत होता.

असे म्हणतात की, १९५७ पासून इतका वेळ अंधारात चाचपडत असलेल्या पंडित नेहरूंना स्पष्ट जाणीव झाली की पाकिस्तानपासून केव्हाही आणि चीनपासून येत्या १–२ वर्षांत भारताच्या उत्तर सरहद्दीला धोका आहे. पण त्यांना हे कळेना की हे दोन्ही धोके टाळण्यासाठी निश्चित काय करावे ! १९५० ते १९५७ ही सात वर्षे आपण फुकट घालवली होती. चीन किंवा पाकिस्तानबरोबर युद्ध टाळण्याच्या दृष्टीने पंतप्रधान या नात्याने पंडित नेहरूंसमोर फक्त दोनच मार्ग होते ! कुठले होते ते दोन मार्ग ? [क्रमशः]

**By arrangement with THACKER & CO. LTD.**
**from their forthcoming publication,**
**" HIMALAYAN BLUNDER " by Brig. J. P. Dalvi**
**© with the original publisher.**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ भवसागर तरणारा स्विमिंग चॅंपियन

ज्योतिषी अन् पत्रकार या दोघांत एक महत्त्वाचा फरक असतो, व त्या फरकामुळेच पत्रकार हा ज्योतिषापेक्षा श्रेष्ठ ठरतो. ज्योतिषी हा फक्त पुढे काय होणार आहे एवढेच सांगतो तर पत्रकार पुढे काय होणार आहे हे तर खात्रीपूर्वक सांगतोच पण ते झाले नाही म्हणजे का झाले नाही हेही खुलासेवार सांगतो. आता ही जगबूडच घ्या. मागल्या वेळी अस्मादिकांनी जगबुडीची गॅरंटी दिली होती. मग माशी कुठे शिकली ? तेच सांगतो.

पहिली गोष्ट म्हणजे ज्याप्रमाणे व्हिएटनाम युद्ध थांबवावे याबद्दल सर्वांची एकवाक्यता असली तरी ते कोणत्या उपायाने थांबवावे याबद्दल मतांची जंगी व्हरायटी आहे, त्याचप्रमाणे जग नष्ट करावे याबद्दल सर्व देवादिकांत एकमत असले तरी त्यासाठी कोणता उपाय योजावा या बाबतीत त्यांच्यांत अगदी हिंदुस्थानातल्या राजकीय पक्षांइतकी दुफळी आहे. वरुणदेवाचे मत होते की जग पाण्यात बुडवावे, पण दिल्लीच्या उन्हाळ्यात एकदा टूरिस्ट म्हणून आलेल्या नारदाने शंका काढली की हेच पाणी दिल्लीच्या तहानलेल्या लोकांच्या तावडीत सापडले तर त्याची अगस्तीच्या आचमनात सापडलेल्या समुद्रासारखी स्थिती व्हायची. शिवाय भवसागर तरून जाण्याचे टेक्निक देवानेच माणसाला शिकविले आहे, तेव्हा त्याच्या जोरावर माणसाने जगबुडीच्या प्रलयावर मात केली तर ?

शंकर म्हणाले, मी सगळे जग जाळून टाकतो. पण कोठल्याशा बॅक-बेंचर देवाने जरा हेटाळणीच्याच सुरात विचारले, "तुम्हांला हे जाळपोळीचं तंत्र काय माहीत? तुम्ही काय हिंदुस्थानातल्या कॉलेजांत ते शिकला आहात ?" काही टेंपररी देवांनी तर निराळाच मुद्दा काढला. ते म्हणाले, "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ' अशा कंडिशनवर आम्हांला स्वर्गात क्वार्टर्स मिळाले आहेत, पण मर्त्यलोक नसला तर आमची राहायची सोय काय ? दिल्लीत एखादा मंत्री पदच्युत झाला की त्याला बंगला सोडावा लागतो अन् मग बिचाऱ्याला साधा फ्लॅटही चटकन मिळत नाही, मग निर्वासित देवांना कोण विचारतो ?" इतर काही किरकोळ देव म्हणाले, "जगबुडीचा निर्णय फक्त दैवी हायकमांडने घ्यावा ही लोकशाही नाही, तेव्हा स्वर्गातल्या सार्वमताने हा प्रश्न सोडविण्यात यावा." इतकेच नव्हे तर त्यांतल्या काही देवांनी या प्रश्नावर इलेक्शन लढविण्याचीही सिद्धता केली.

इतका सर्व गोंधळ झाल्याने शेवटी असे ठरले की माणसाने स्वतः अणुबाँब, हायड्रोजनबाँब इत्यादी तयार करून जग नष्ट करण्याच्या कामी बरेच कौशल्य संपादन केले आहेच, तेव्हा ज्या गोष्टीत माणूस वाकबगार आहे त्यात अनभिज्ञ देवाने हस्तक्षेप करू नये. माकडाच्या हाती कोलीत काय किंवा माणसाच्या हाती विज्ञान काय, परिणाम एकच होतो, तेव्हा हे काम माणसाच्या हाती सोपविल्यास ते होण्याची शंभर टक्के गॅरंटी आहे याबद्दल देवांनी निर्धास्त असावे.

## ☐ निसर्गाकडे ( मोटरीतून ) चला !

इटलीत तयार होणाऱ्या काही नवीन मोटरगाड्या चित्ता, सिंह इत्यादी वन्य पशूंच्या कातड्याने मढविण्यात येणार आहेत, तर काही मोटरींना हत्तीसारखी सोंडही लावण्यात येणार आहे, असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. 'बॅक टु नेचर !' 'निसर्गाकडे परत चला' असा काही समाजशास्त्रज्ञांनी आधुनिक मानवाला दिलेला आदेश माझ्या पाहण्यात आहे, पण निसर्गाकडे चला म्हणजे अगदी मोटरीत बसून चला, असा त्याचा अर्थ होईलसे मला वाटले नव्हते. या मोटरींना चित्ता, सिंहीण अशी नावेही देण्यात येणार आहेत. ही मात्र नाव घेण्याजोगी सुधारणा म्हटली पाहिजे. कारण अमेरिकेतल्या मोठमोठ्या शहरांतून दिसणाऱ्या मोटरींच्या लांबलचक रांगेला 'रॅट रेस'– 'उंदरांची शर्यत' –म्हणायची पद्धत आहे, तेव्हा उंदराचा वाघोबा झाला ही काही लहानसहान सुधारणा नाही. हत्तीची सोंड लावलेली मोटरगाडी हे गौडबंगाल मात्र अस्मादिकांच्या पादचारी मेंदूत काही केल्या शिरत नाही. कदाचित आधुनिक महाराजाच्या गजांतलक्ष्मीचा हा पाश्चिमात्य अवतार असावा.

ते काही असो, आधुनिक माणसाच्या 'जंगली' मनोवृत्तीला वाट करून देण्याचा हा एक मानसशास्त्रीय प्रयोग असेल तर असेच आणखी उपायही योजता येतील– वल्कलासारखे दिसणारे टेरिलीन, मृगाजिनासारखे दिसणारे सूटचे कापड, लोकरीत लपेटलेला रेफ्रिजेटर, कोकिळेच्या पिसांनी मढविलेला रेडिओ अन् चकमकीच्या आकाराचा सिगरेट-लायटर. पण असा हा आधुनिक जंगली माणूस रस्त्यात भेटला तर 'कसं काय' म्हणू नका. म्हणा–"याऽऽहू..." ○

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे । । । । । । । । । । । । । ।

बेचाळीस रुपये । । । । । । । । । । । । । ।

राजहंस प्रकाशन । । । । । । । । । । । । । ।

२२ मार्च १९६९

दत्तप्रसाद दाभोळकर

# अंतराळ प्रवासाची पडशी

" अपोलो आठ " यानातून चंद्राभोवती प्रदक्षिणा घालण्याचा विक्रम फ्रँक बोरमन जेम्स लॉव्हेल, विल्यम अँडर्स या तीन अमेरिकन अंतराळवीरांनी केला— या अक्षरश: " जगावेगळ्या " प्रवासात या प्रवाशांनी बरोबर कपडे कसले नेले होते? आणि त्यांच्या मातृभूमीने कोणते भूकलाडू, तहानलाडू, त्यांच्याबरोबर दिले होते? कारण, शास्त्रीय परिभाषेपेक्षा आपल्यासारख्यांना पोटापाण्याची (दुसऱ्यांच्या ?) उत्सुकता असते. या विषयीची माहिती अमेरिकेने नुकतीच प्रसिद्ध केली आहे.

या तिघा अंतराळवीरांनी एकावर एक असे तीन अंतराळ पोषाख चढविले होते. वेगवेगळ्या तपमानापासून, किरणोत्सर्गापासून संरक्षण करण्यासाठी तीन तीन अव जड पोषाखांची योजना केली होती. पोषाखातच विविध यांत्रिक उपकरणे बसविली होती. नुसत्या शिरस्त्राणांतच दोन हेडफोन, दोन मायक्रोफोन (एक यानातील इतर सहप्रवाशांशी बोलण्यासाठी तर दुसरा पृथ्वीवरील नियंत्रक केंद्राशी बातचीत करण्यासाठी) बसविले होते. विशेष प्रसंगी लागला तर चार तास पुरेल इतका ऑक्सिजनचा साठा पोषाखातच करून ठेवला होता.

प्रवाशांचे सर्व खाद्यपदार्थ चांगले चूर्ण करून आणि जलोत्सर्जित स्वरूपांत (डिहायड्रेटेडकरून) पॉलिथिन पिशवीत हवाबंद करण्यात आले होते. या प्रत्येक पिशवीला स्टोव्हच्या पंपात असते तशी एक झडप होती. या झडपेतून पिशवीत पाणी भरले की झाले जेवण तयार ! अशा कितीतरी भोजनपिशव्या यानात होत्या आणि त्या प्रत्येक पिशवीवर अंतराळ वीराचे नाव, खाण्याचा दिवस, वेळ सर्व काही लिहून ठेवले होते ! प्रवासातल्या या ' रेशनिंगचे ' कारण मात्र शास्त्रीय होते ! प्रत्येक अंतराळ वीराला वेगवेगळ्या चवीचा, पौष्टिक आणि समतोल आहार–दिवसाला २८०० कॅलरीज मिळावा म्हणून ही सारी योजना होती. पाण्याची व्यवस्था मात्र यानाच्या दुसऱ्या भागात केली होती. जेवणाबरोबरच पिशवीत प्रत्येकाचा वेगळा टूथब्रश आणि पेस्ट पण होती !

एवढ्या दूरच्या प्रवासाला बरोबर औषधपाणी पण हवेच ! औषधाच्या अशा दोन बॅगा होत्या. या औषधांत, प्रवासात मळमळायला लागले तर द्यायची जशी

इंजेक्शन्स होती तशीच अंग मोडून आले तर वेदना कमी करण्याची पण इंजेक्शन्स होती. त्याशिवाय वेगवेगळी मलमे, चिकटपट्ट्या, आणि गोळ्या होत्या. या गोळ्यांत अ‍ॅस्पिरिन होते. तशाच झोपेच्या गोळ्या पण होत्या. पण ही औषधे, नियंत्रक कचेरीतील डॉक्टरांनी सांगितल्यावरच घ्यायची असे सांगण्यात आले होते !

## स्त्री–पुरुष समान आहेत काय ?

सामाजिक समानतेच्या आजच्या जमान्यात हा प्रश्न मोठ्या हिरीरीने चर्चिला जातो. या प्रश्नावर स्त्री-पुरुषांचे दोन वेगवेगळे गट पडले असते, तर ते सहज समजू शकले असते, पण गंमत अशी आहे की, नुसत्या पुरुषांत याविषयी दोन गट परस्परविरोधी आहेत. तसेच स्त्रियांच्यातदेखील ! शास्त्रज्ञ याविषयी काय सांगू शकतात ? आपले वैयक्तिक राग–लोभ, द्वेष–प्रम, आपुलकी–अढी, बाजूला ठेवून शास्त्रीय दृष्ट्या ' त्या न्यायाधीशा 'चे काय मत आहे हे पाहणे खचितच उद्‌बोधक ठरेल !

जीवनशास्त्रज्ञ सांगतात की जीव-धारणेच्या वेळी गर्भात असलेल्या अठ्ठेचाळीस क्रोमोझोम्सपैकी फक्त एका क्रोमोझमच्या निराळेपणामुळे मुलगा अथवा मुलगी असा फरक पडतो. मुलाच्या बाबतीत सेहेचाळीस क्रोमोझोम्सबरोबर एक ' अ ' क्रोमोझोम आणि

## केवळ माहितीसाठी

" अपोलो आठ या यानाने एकूण ६५०,००० किलोमीटर प्रवास केला आणि तोसुद्धा अवघ्या १४७ तासांत. यानाच्या या अतिप्रचंड वेगासाठी सॅटर्न–पाच ' नावाच्या क्षेपणास्त्राने उड्डाणाच्या वेळी स्फोटाने एवढी मोठी शक्ती निर्माण केली की, तेवढ्या शक्तीवर – क्षमतेवर – एक मोटार ताशी ९० किलोमीटर वेगाने सतत ३४ वर्षे चालू शकली असती; किंवा थोडक्यात तेवढ्या पेट्रोलवर मोटारीच्या ४०० पृथ्वीप्रदक्षिणा झाल्या असत्या. यानाला आकाशात फेकण्यासाठी सॅटर्न–पाचच्या इंध-नाच्या टाक्या इतक्या भव्य होत्या की ९६ रेल्वे वाघणींतील पेट्रोलसारखे इंधन त्यात भरावे लागले. अपोलो यानाच्या कमांड मोड्यूलमध्ये (जिथून प्रवासी यानाचे नियंत्रण करतात) २४ किलोमीटर लांबी-इतके वेगवेगळे वायरिंग करावे लागले आणि या " कमांड मोड्यूल-" मध्ये वेगवेगळे २० लाख सुटे यांत्रिक भाग जोडले होते. ( मोटारीसारख्या वाहनात याच यांत्रिक सुट्या भागांची संख्या ' अवघी ' तीन हजार असते.) नियंत्रक विभागात वेगवेगळी ५०६ बटन्स असतात. ७१ तऱ्हेतऱ्हेचे दिवे आणि ४० यांत्रिक विभागांची स्थिती सांगणारे दिवे होते.

एक ‘ ब ’ क्रोमोझोम असतो. मुलीच्या बाबत या ‘ अ ’ आणि ‘ ब ’ क्रोमोझोम्सऐवजी दोन मोठे ‘ अ ’ क्रोमोझोम्स असतात. बस्स ! एवढाच फरक ! पण त्यावर मुलगा की मुलगी ठरते ! जीवधारणेच्या या सुरुवातीच्या छोट्याशा फरकाची पुढे वारंवार पुनरावृत्ती होत जाते, आणि स्त्री–पुरुषांतील शारीरिक आणि मानसिकसुद्धा फरक वाढत जातो.

या होत असलेल्या फरकाची पाहणी शास्त्रज्ञांनी केली तेव्हा बरीच मनोरंजक माहिती मिळाली. एक म्हणजे मुलींपेक्षा मुलांच्या जन्माचे प्रमाण थोडे जास्त आहे. १०० मुलींच्या जन्माबरोबर १०५·५ मुलांचा जन्म होतो. पण, अगदी प्रगत देशातदेखील, मुलांच्या बालमृत्यूचे प्रमाण मुलींच्या बालमृत्युपेक्षा जास्त आहे. मुलांच्या बालमृत्यूचे हे प्रमाण मुलींच्यापेक्षा जवळ जवळ २७ टक्क्यांनी जास्त आहे.

शरीरवाढीबाबत–मुलींच्या शरीराची वाढ मुलापेक्षा जलद होते. मुलींच्या शरीरातील हाडे मुलांच्यापेक्षा लवकर कणखर होतात. दुधी दात पडून दुसरे खायचे दात मुलांपेक्षा मुलींना लवकर येतात. आणि मजा म्हणजे तेरा वर्षांच्या मुलापेक्षा तेवढ्याच वयाची मुलगी थोडीशी का होईना जास्त उंच असते ! जी गोष्ट शरीर-वाढीची तीच ग्रहणशक्तीची ! एकाच घरातील सारख्याच संस्कारांत वाढणाऱ्या मुलामुलींमध्ये ‘ बेबी ’च बोलण्यात जास्त चुणचुणीत असते ही तर तुमच्या–आमच्या पाहण्यातील गोष्ट आहे. ‘ बाळ्या ’ जरा मंदच ! अमेरिकेतील पाहणीत मुलांपेक्षा तेवढ्याच वयाच्या मुलींचे शब्दज्ञान ( Vocabullary ) बरेच जास्त असल्याचे आढळून आलेले आहे.



या शारीरिक वाढीच्या फरकानंतर मात्र स्त्री-पुरुषांमध्ये श्रेष्ठ कोण हे ठरविणे शास्त्रज्ञांनाही सांगता येत नाही. सामान्य बुद्धिमत्तेबाबत एक पाहणी करण्यात आली. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या ल्युईस टर्मन यांनी पूर्ण वाढ झालेल्या १५०० मुलामुलींबाबत याबाबतीत पाहणी केली. या पाहणीसाठी विशेष बुद्धिमान–ज्यांचा बुद्धिमत्ता क्रमांक (Intellgence Quotient) १३२ पेक्षा अधिक होता–अशी मुले निवडली होती. वेगवेगळ्या चाचण्यांनंतर काळजीपूर्वक केलेल्या या अभ्यासात मुलींपेक्षा मुले बुद्धिमत्तेत श्रेष्ठ असतात, असे अनुमान काढता येत नाही.

याचा अर्थ एवढाच की, बौद्धिक क्षमतेबाबत स्त्री–पुरुष सारखेच श्रेष्ठ (किंवा कनिष्ठ) आहेत ! आणि म्हणूनच व्यक्तीचे मूल्य तो पुरुष आहे की स्त्री आहे यावर ठरविणे केवळ असंस्कृत नाही तर अशास्त्रीय पण आहे !

आपण भारतीयांनी मात्र विज्ञाननिष्ठेबरोबर सांस्कृतिक निष्ठा ठेवली पाहिजे, कारण स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेच्या स्त्रियांच्या भाषणात सांगितले होते की, " आम्ही भारतीय पुरुष स्त्रियांना आमच्याबरोबरचे कधीच समजत नाही ! आम्ही त्यांना आमच्यापेक्षा श्रेष्ठ समजतो ! " ○

## विज्ञान आणि जीवन. . ! .

" नोबेल " पारितोषिक मिळवणाऱ्या फ्रँक क्रिक या माझ्या मित्राकडे एकदा एक तरुण जीवशास्त्रज्ञ आला. मज्जासंस्थेविषयी स्वतःचे अनेक नवे विचार त्याने फ्रँक क्रिकला समजावून सांगण्यास सुरुवात केली. आपल्या भाषणाचा क्रिकवर काही विशेष परिणाम दिसत नाहीसे पाहून तो तरुण शास्त्रज्ञ म्हणाला, " माझा सिद्धांत आपल्याला पटत नाही ? माझे म्हणणे मी गणिताने सिद्ध करून दाखवावयास तयार आहे ! "

क्रिक या प्रश्नावर फक्त हसला ! आणि शांतपणे तो म्हणाला, " मित्रा, तू जे गणिताने सिद्ध करू पाहतोस ते तुला शब्दांतदेखील मांडता आले पाहिजे. नाहीतर तुलाच ते समजले नाही असे मी समजेन. शब्दांतील गोंधळ हा बहुधा विचारांतील गोंधळाचाच निदर्शक असतो. विज्ञान सर्वसामान्य लोकांना समजावून सांगताना तुम्ही वैज्ञानिक का गोंधळता हेच मला समजत नाही; कारण विज्ञान म्हणजे सत्य आणि सत्य नेहमीच समजावयास सोपे असते ! "

याचा अर्थ एवढाच की लोकांना विज्ञान समजावून सांगताना तुम्हांला त्या त्या देशातील लोकांना समजेल अशी भाषा वापरावी लागेल. भारतात तुम्हांला तत्त्वज्ञान गणित आणि संतवाङमय यांच्या संदर्भात विज्ञान शिकवावे लागेल !

[ डॉ. ब्रोनोवस्की यांच्या मुलाखतीवरून ]

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज

**मेष :** आजवर आपणांस सूर्याची सहानुभूती लाभत असे, आता तीही गमावून बसला आहात. सध्यातरी निदान अंतरिक्षातील बरेचसे ग्रह आपणांवर नाराज आहेत. प्रकृती, पैसा आणि प्रतिष्ठा या सर्वांवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे.

विचाराने, सावधानपणाने पावले टाकलीत तरच अनवस्था प्रसंग टळेल; अर्थात् निर्धारनिष्ठेचे भांडवल आपल्याजवळ भरपूर असल्यामुळे, अशा अनिष्ट कालातूनही आपण यशाचा फार मोठा भाग पदरी पाडून घेऊ शकाल. अपयश सहसा तुमच्याजवळपासही फिरकू शकत नाही.

दि. २५ ते २७ विशेष अनुकूल दिवस.

**वृषभ :** नित्याच्या व्यवहारात, नोकरीधंद्यांत या वेळी आपणांस वेगळाच पण चमत्कारिक अनुभव येऊ लागेल. कोणतेही काम अपेक्षेप्रमाणे लवकर झाले असे कधी वाटणारच नाही. प्रत्येक गोष्ट अडखळत, धडपडतच करणे भाग पडेल. याला मुख्य कारण सातव्या मंगळाचा सतत विरोध.

व्यावसायिक मतभेद विकोपाला जातील, कौटुंबिक संघर्ष पदोपदी जाणवायला लागतील, नोकरीत वैचारिक वादळे क्षणाक्षणाला उठू लागतील.

अशाही परिस्थितीत पाचवा गुरू तुमच्या पाठीशी असल्यामुळे, तुमच्या प्रतिष्ठेला यत्किंचितही धक्का लागणार नाही. जपून आणि विचाराने पावले टाका.

दि. २६ ते २८ काहीसा अनुकूल काल.

**मिथुन :** गुरू अनुकूल नाही म्हणून मागे रेंगाळू नका. कोणत्याही गोष्टीत घोळ घालीत बसू नका. कोणत्याही गोष्टीचा एकदम निर्णय घ्या आणि पुढे चला. अपयशाची यत्किंचितही धास्ती बाळगण्याचे कारण नाही.

प्रगतीच्या नव्या वाटा याच आठवड्यात दृष्टिक्षेपात यायला लागतील, नव्या आशा अंकुरायला लागतील, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

# श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. २२ ते २८ मार्च राशिभविष्य

शेती, खते, रासायनिक द्रव्ये इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींना तर हा काल नेत्रदीपक यशाचा ठरावा.

स्थावराची व वाहनाची विवंचना मिटेल, भागीदारीची अपेक्षा सफल होईल. थोरांच्या कृपेने हवे ते मिळू शकेल.

दि. २७–२८ हे दिवस विशेष अनुकूल जाणवतील.

**कर्क** : काहीतरी अभिनव-आकर्षक-लोकोत्तर असे करावे, ही तुमची कित्येक दिवसांची असफल आकांक्षा आता याच कालात सफल व्हावी अशीच या वेळची अनुकूल ग्रहरचना आहे.

नवे भव्य कार्यक्षेत्र उभारले जाईल, धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग आक्रमिले जातील, राजकीय क्षेत्रातही तुमचे महत्त्व वाढविणाऱ्या घटना घडतील.

तुम्हांला या वेळी धनिकांचे साहाय्य लाभेल आणि परराष्ट्रीय व्यापारधंद्याकडे लक्ष दिले जाईल; कलात्मक वस्तू, सौंदर्यप्रसाधने, जडजवाहिर इत्यादी व्यापार-धंद्याशी आपल्यापैकी काहींचा संबंध असेल तर आपल्या अपेक्षा पूर्णत्वाने सफल होतील.

दि. २१ ते २४ विशेष अनुकूल दिवस.

**सिंह** : इतर ग्रहांची कितीही अनुकूलता असली तरी मंगळ चौथा असेपर्यंत अपेक्षेप्रमाणे काही घडेल ही आशाच खोटी.

हाती घेतलेली बरीचशी कामे गतिशून्य बनू लागतील, आखलेल्या बऱ्याचशा योजना वेग घेईनाशा होतील. पैशाअडक्याचे अंदाजपत्रक तर साफ कोलमडेल.

याच काळी असाही अनुभव वरचेवर यायला लागेल की, अगदी भरंवशाच्या माणसांनी दिलेली अभिवचने साफ खोटी ठरतील. प्रकृतीच्या तक्रारी मधून मधून जाणवायला लागतील. असे असूनही नोकरीधंद्यातील तुमचे स्थान डळमळणार नाही, सामाजिक प्रतिष्ठेला धक्का लागू शकणार नाही.

दि. २३ ते २७ विशेष प्रगत व लाभाचा काल.

**कन्या** : सध्या आपणांस शनी ८ वा आहे, पण या आठव्या शनीत घास्ती घेण्यासारखे काही घडणार नाही, निदान गुरू तुमच्या राशीत असेपर्यंत तरी.

पराक्रमातील मंगळ ही प्रचंड शक्ती आपल्या पाठीशी उभी आहे. आता आपणांस कोणतीही गोष्ट अशक्य, अवघड वाटू शकणार नाही, जे घडावे असे वाटेल ते घडले म्हणून समजावे.

प्रवास, धावपळ, दगदग मात्र सतत करावी लागेल, नोकरीत बदली-बढतीचे योग येतील, विज्ञानाचे नवे क्षेत्र हस्तगत होईल. साहित्याच्या क्षेत्रातही विशेष असे कार्य करून दाखवाल.

दि. २६ ते २८ या कालाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल.

**तूळ** : सध्याचे आपले ग्रहयोग तसे वाईट नाहीत, पण फारसे चांगलेही नाहीत. शिकस्तीचा प्रयत्न केल्याशिवाय काहीच पदरी पडू शकणार नाही.

तुमच्या चालत्या गाड्याला अनेकांकडून अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न होईल. हितशत्रूंची कारस्थाने वाढू लागतील, औद्योगिक क्षेत्रातून तुम्ही गाशा गुंडाळावा म्हणून अनेकांची धडपड सुरू होईल, पण प्रत्यक्षात तसे काहीच घडणार नाही.

दक्षतेने सारे व्यवहार करा. नेत्र, मुख रोग बळावतील, सांपत्तिक ताण कमालीचा जाणवेल, वादविवाद वाढू लागेल. कोणतीही गोष्ट विकोपाला जाऊ देऊ नका.

दि. २५ ते २७ विशेष अनुकूल काल.

**वृश्चिक** : वृश्चिकेच्या मंगळात जिद्द आणि निर्धार हा अलौकिक गुण आहे. असा मंगळ सप्टेंबरपर्यंत तुमच्या राशीतच वास्तव्यास असल्याने त्याचा वाण आणि गुण तुम्हांला लागल्याशिवाय कसा राहील ?

वैद्यकीय, स्थापत्य, अर्थशास्त्रीय व्यवसायात असे काही घवघवीत यश आपण मिळवाल की, आजपर्यंतचे सारे विक्रम आपणांकडून मोडले जातील.

कला आणि क्रीडा क्षेत्रांतही आपला आवाज उठवाल, साहित्याचा प्रांतही तुम्हांला फारसा अपरिचित नाही. त्या प्रांतातही आपण प्रतिष्ठेने मिरवू लागाल.

तात्पर्य, सध्याचे दिवस आपणांस अनेक चांगल्या बाबतींत चिरस्मरणीय ठरावेत.

दि. २६ ते २८ या कालावर लक्ष ठेवा.

**धनू** : सध्या आपले सारे मार्ग रोखलेत १२ व्या मंगळाने उद्योगधंद्यात अविश्रांत परिश्रम करूनही अपेक्षित यश दिसू शकणार नाही. वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्यात फारसे यश मिळणार नाही. साऱ्याच गोष्टींत जपून सांभाळून चालावे लागेल.

व्यापारी क्षेत्रातील व्यक्तींनी तर व्यवसायधंद्यात कोणतेही साहस करणे इष्ट ठरणार नाही.

दशमांतील गुरू मात्र तुमची सदैव पाठराखण करीत राहील. आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागू नये म्हणून तो सदैव जपेल. सामाजिक व राजकीय क्षेत्रांशी सध्यातरी मुळीच संबंध ठेवू नका.

दि. २३–२५–२८ विशेष अनुकूल दिवस.

**मकर :** तुमच्यातील सुप्त सामर्थ्याला उत्थान देणारी ग्रहस्थिती या वेळी निर्माण झालेली आहे. नोकरीधंद्यात, सामाजिक क्षेत्रात तुमचे श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध करायला ही ग्रहस्थिती कटिबद्ध आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमात हिरीरीने भाग घ्याल, सभासंमेलने गाजवाल. वैज्ञानिक क्षेत्रात तर आवाज उठवाल. ज्या ज्या व्यवसायांशी आपला संबंध असेल, त्यांत तुम्ही अत्युच्च प्रतिष्ठेचे स्थान मिळवू शकाल.

चौथ्या शनीची फारशी दखल घेण्याची गरजच भासणार नाही. स्थानांतर घडेल, नव्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी थोडेफार परिश्रम पडतील.

दि. २२ ते २५ नोंद करण्यासारखा महत्त्वाचा काळ.

**कुंभ :** दशमातील मंगळ ही एकच ग्रहस्थिती तुमच्या व्यावसायिक प्रगतीला पुरेशी ठरेल, याच काळापासून आपल्या व्यवसायक्षेत्राला उत्थान मिळू लागेल.

यांत्रिक–विद्युत–वैद्यकीय क्षेत्राशी संबंध असणाऱ्या व्यक्तींनी तर याच्याइतका सर्वोत्तम प्रगतीचा काल यापूर्वी क्वचितच अनुभवला असेल.

भविष्यकालात घडून येणाऱ्या अनेक क्रांतिकारक घटनांचे उगमस्थान हेच होय. या कालापासून अनेक प्रभावी योजना आकार घेऊ लागतील.

साडेसाती संपून गेलेली असल्याने आता कोणत्याही प्रसंगी माघार घेण्याची गरजच नाही.

दि. २४ ते २७ अनुकूल काळ.

**मीन :** गुरू–मंगळांचे हार्दिक सहकार्य आपणांस कित्येक महिने मिळत राहील आणि त्यामुळेच आपला घसरलेला व्यवसाय पुन्हा नेटाने उभा करता येईल. आजवरच्या बहुतेक साऱ्या असफल आकांक्षा याच काळात आपणांस पूर्णांशाने सफल करता येतील, चित्रपट सृष्टीतील कलावंतांना तर या कालाइतका सर्वांगाने प्रगतीचा काल यापूर्वी क्वचितच आलेला असेल.

सतत प्रवास करावा लागेल, नव्या योजनांना गती द्यावी लागेल. अनेकांची मदतही मिळेल, सांपत्तिक लाभही मोठ्या प्रमाणावर होऊ लागतील.


दि. २३ ते २७ विशेष अनुकूल काल.

**मुंबई समाचार** ........................................ [पृष्ठ १६ वरून

करून संस्थेने मुंबईचे नेव्हीतील ले. जॉर्ज ड्यूक व कलकत्त्याचे, डॉक्टरेटचे विद्यार्थी श्री. पिनाकी चटर्जी ह्यांची निवड केली. ह्या दोन्ही तरुणांना तब्बल दोन-तीन महिने प्रशिक्षण देऊन त्यांची तयारी करवून घेतली आणि नंतरच त्यांची ह्या साहसी सफरीवर रवानगी केली. आत्मविश्वास आणि जिद्द ह्यांच्या जोरावर ह्या वीरांनी असंख्य संकटांवर मात करून ही कामगिरी पार पाडली! त्यांचे हे यशस्वी साहस आणि श्री. मिहीर सेन ह्यांच्या एक्स्प्लोरर्स क्लबचे कार्यक्रम अनेक भारतीय तरुणांची मने उचंबळून सोडतील आणि त्यांच्यांतल्या सुप्त साहसी वृत्तींना आवाहन करतील अशी आशा करू या.

# राज्यपाल धर्मवीर, बंगाल आणि केंद्र

पश्चिम बंगालमध्ये संयुक्त आघाडी सरकार भरघोस बहुमताने निवडून आले, ते अधिकारारूढ झाले आणि लागलीच, अपेक्षेप्रमाणे तिथे कटकटी सुरू झाल्या. 'घेराव'चे सत्र पुन्हा जोरात सुरू झाले आहे आणि औद्योगिक शांतता कशी नांदू शकेल, हा प्रश्न खुद्द संयुक्त आघाडीच्या प्रमुख नेत्यांना भेडसावू लागल्याचे त्यांच्या ताज्या वक्तव्यांवरून दिसून येत आहे. परंतु ह्याहिपेक्षा अधिक चिंतेचे प्रश्न घटनात्मक आणि केंद्रराज्यसरकारामधील परस्परसंबंधांचे आहेत. ह्या संघर्षातली पहिली ठिणगी, बंगाल विधानसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्यपाल धर्मवीरांच्या अभिभाषणाच्या वेळी उडाली. वास्तविक हा संघर्ष टाळून, लोकनियुक्त सरकारला सुरळीतपणे व केंद्राविषयी दुजाभाव मनात न बाळगता कारभार चालू करू देणे, केंद्रसरकारला सहज शक्य झाले असते. पण केंद्राने ते टाळले.



बंगालच्या लोकनियुक्त सरकारने उघडउघड मागणी केली असताही व खुद्द राज्यपालांनी विनंती केली असताही, केंद्राने विधानसभेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी राज्यपालांना बंगालमधून उचलले नाही आणि एकप्रकारे बंगालला केंद्रसरकारविरुद्ध भांडण उकरून काढायलाच वाव दिला. ह्याचा अर्थ केवळ असाच करावा लागेल. विरोधी सरकार अधिकारारूढ झालेले बघण्याची व त्या सरकारशी निभावून घ्यायची सवय अद्याप काँग्रेसला झालेली नाही.

ह्या सर्व प्रसंगांत घटनात्मक पेचप्रसंग अर्थातच उभे राहिलेले आहेत व त्यांची सांगोपांग चर्चाही अर्थातच पुन्हा सुरू होईल. लोकनियुक्त मंत्रिमंडळाचे अधिकार आणि राज्यपालांचे अधिकार ह्यांच्यांतला हा पेच आहे. जोपर्यंत सर्वत्र काँग्रेसच अधिकारावर होती, तोपर्यंत ह्या पेचप्रसंगाची ओळख आपल्याला झाली नाही. परंतु इथून पुढे केंद्रस्थानी व अन्य राज्यांतून भिन्नभिन्न सरकारेच अस्तित्वात येणार असल्यामुळे व राज्यपाल हा केंद्रसरकारचा त्या त्या राज्यातील प्रतिनिधी म्हणून वावरत असल्याने, राज्यपाल व राज्यसरकार म्हणजेच, पर्यायाने केंद्रसरकार व राज्यसरकार ह्यांच्यांतील परस्परसंबंधांना व त्यांच्या अधिकार-कक्षांना विशेष महत्त्व येणार आहे. ह्या नवीन संबंधांच्या पार्श्वभूमीवर आपली घटना पुन्हा एकदा तपासून पाहिली पाहिजे व जरूर तर तीत आवश्यक त्या दुरुस्त्याही केल्या पाहिजेत. परंतु तोपर्यंत लोकप्रतिनिधींनी, राज्यपालांनी व केंद्र-राज्यसरकारांनी घटनेचा उपयोग शासन सुरळीत व लोककल्याणार्थ राबविण्यासाठी केला पाहिजे. प्रत्यक्षात मात्र, घटनेचा आधार घेऊन ही सर्व मंडळी अनिष्ट कृतीच करताना आढळून येतात. एखादा सभापती उठतो, घटनेचा आधार घेतो आणि स्वपक्षाला विधानसभेत मतदानाच्या दिव्यातून जावे लागू नये म्हणून स्वतःच्या अधिकारात विधानसभेचे अधिवेशनेच बेमुदत तहकूब ठेवतो. राज्यपाल स्वतःच्या अखत्यारीत घटनेचा आधार घेऊन घाईघाईने राज्यसरकार बडतर्फ करतो व त्या जागी डॉ. प्रफुल्लचंद्र घोषांचे अल्पमतातले सरकार अधिकारावर आणतो आणि राज्यपाल करीत असलेली प्रत्येक कृती केंद्रसरकारच्या संमतीनेच करीत असतो हे उघड सत्य असूनही, राज्यपालांच्या काही कृतीविषयी केंद्रसरकार, घटनेचा आधार घेऊन चक्क कानावर हात ठेवते आणि म्हणूनच असे वाटते की, ह्यातला हा प्रत्येक घटक, लोकाभिमुख कारभारासाठी नव्हे तर स्वार्थासाठी, संघर्ष टाळण्यासाठी नव्हे तर ते वाढवण्यासाठीच, घटनेचा स्वतःच्या अधिकारात दुरुपयोग करीत असतो.

परवाच्या प्रसंगीदेखील केंद्रसरकार, बंगाल सरकार आणि राज्यपाल ह्या तिघांनाही हा संघर्ष टाळता आला असता. केंद्रसरकारला राज्यपालांची बदली करून बंगालचा विश्वास मिळवता आला असता व केंद्र - राज्यसंबंध सुधारण्याचा प्रयत्न करता आला असता. राज्यपालांनी सरकार बडतर्फ केल्यानंतरही जनतेने आपल्याला प्रचंड बहुमताने निवडून देऊन राज्यपालांना परस्पर उत्तर दिले आहे असा विचार

करून, श्री. धर्मवीरांचा नव्हे तर राज्याच्या घटनात्मक प्रमुखाचा मान त्या अप्रिय घटनांचा उल्लेख आभाराच्या ठरावात न करून बंगालला राखता आला असता व कटुता टाळता आली असती. राज्यपालांनीही लोकनियुक्त प्रतिनिधींनी तयार केलेल्या भाषणातले उतारे गाळून काही साधले आहे असे वाटत नाही. कारण सरकार, बहुमताच्या जोरावर, त्या गाळलेल्या उताऱ्यांसह भाषणाची नोंद करून घ्यावी असा ठराव पास करून घेऊ शकेल हे त्यांना चांगले माहीत आहे. वास्तविक तिन्ही संबंधितांना संयम दाखवून हा संघर्ष, पेचप्रसंग टाळता आला असता, परंतु त्यांचे वर्तन बारकाईने बघितले तर कुणालाच तशी इच्छा नव्हती असेच वाटते.

---

## सरकारी उद्योगधंदे !

---

समाजवाद आणि सर्वच उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण हे आता रोजच्याच चर्चेचे विषय झालेले आहेत. 'डेमॉक्रॅटिक सोशॅलिझम' (लोकशाही समाजवादी समाजरजना) ही आपल्या केंद्रसरकारची घोषणा आहे; अर्थातच, रेल्वेज, आयुर्विमा, वगैरे व्यवसायांचे राष्ट्रीयीकरण करून आणि पोलाद, वीज–उत्पादन, वगैरे क्षेत्रांत शिरून सरकार आपल्या घोषणेनुसार कार्यक्रम आखत असल्याचेही सरकारने दाखवून दिले आहे. आता बँका, सर्वसाधारण विमा आदी व्यवसायांचे, किंबहुना सर्वच आर्थिक व्यवसायांचे राष्ट्रीयीकरण व्हावे अशी मागणी समाजवादाच्या, साम्यवादाच्या पुरस्कर्त्यांकडून केली जात आहे. अशा परिस्थितीत, केंद्र राज्य सरकारांनी जे व्यवसाय सुरू केलेले आहेत त्यांची, सरकारी प्रवक्त्यांनीच केलेल्या वक्तव्यांद्वारा मिळत असलेली माहिती उद्बोधक ठरेल.

राज्यसरकारनी उद्योगधंद्यात–उत्पादनात शिरावे ही कल्पना पुढे येण्यापूर्वीच, म्हैसूरने अशा तऱ्हेचे पाऊल टाकले होते. तेव्हा त्यांचा अनुभव विचारात घेण्याजोगा आहे. म्हैसूरचे अर्थमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे ह्यांनी म्हैसूर विधानसभेत स्पष्टच सांगितले, राज्याच्या अंगिकृत व्यवसायामुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर फार मोठा ताण पडत आहे. म्हैसूर सरकारची आजची एकूण आर्थिक गुंतवणूक ६८ कोटींची आहे. परंतु ह्या गुंतवणुकीपासून काही फायदा होण्याऐवजी, म्हैसूरला गेली काही वर्षे जबरदस्त नुकसानच सोसावे लागत आहे. 'हिंदुस्थान स्टील' हा केंद्र सरकारचा व्यवसाय ! रुरकेला, दुर्गापूर आणि भिलाई ह्या तीन प्रचंड पोलाद–कारखान्यांमध्ये त्याचा विस्तार. ह्या तिन्ही केंद्रांत मिळूनही 'हिंदूस्थान स्टील' कुठल्याही तऱ्हेचे प्रगतीचे टप्पे गाठू शकलेले नाही. हे तिन्ही कारखाने क्षमतेपेक्षा खूपच कमी उत्पादन करतात; परंतु तेथील कर्मचाऱ्यांची संख्या मात्र आवश्यकतेपेक्षा दुप्पट आहे. भिलाई कारखान्यासंबंधी लोकसभेत बोलताना पोलादमंत्री श्री. पुनाचा ह्यांनी ही माहिती देऊन पुढे म्हटले आहे की, भिलाईला

सध्या पंचवीस हजार कामगार आहेत. भिलाईएवढ्याचं कार्यक्षमतेचा एक पोलाद कारखाना रुमानियात आहे. तेथील उत्पादन भिलाईएवढेच (२५ लक्ष टन दरवर्षी) असले तरी कामगारसंख्या मात्र भिलाईच्या जवळ जवळ एक चतुर्थांशच आहे, कारखान्यातले इतर गैरव्यवहार, लाचलुचपतीचे व सावळ्या गोंधळाचे प्रकार सर्वश्रुतच आहेत. भोपाळच्या हेवी इलेक्ट्रिकल्सचीही फारशी भिन्न परिस्थिती नाही. महाराष्ट्रातल्या सरकारी कारखान्यांच्या, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळ व वीज मंडळाच्या, वेस्टच्या बातम्या आपण नेहमी ऐकतोच. हे ऐकल्यावर, राष्ट्रीयीकरणाच्या, समाजवादी–समाजरचनेच्या कार्यक्रमाविषयी मन साशंक झाले नाही तरच नवल.

भारतासारख्या देशात काही मूलभूत व जड उद्योगधंद्यांची मालकी सरकारच्या हाती असावी असेच बऱ्याच जणांना वाटते. ह्याचाच अर्थ, संमिश्र अर्थव्यवस्थाच तूर्त तरी भारताला लाभप्रद ठरणार हे उघड आहे. आणि त्याचबरोबर, मूलभूत व जड उद्योगधंद्याची मालकी सरकारकडे असावी हेही उघड आहे. परंतु त्याच बरोबर, हे उद्योगधंदे जर अशा प्रकारे लाचलुचपत, गैरव्यवहार, आणि नुकसानीतच चालायचे असले तर त्यामुळे इथल्या अर्थव्यवस्थेवरही गैरवाजवी ताण पडेल हे सांगायला अर्थशास्त्रज्ञाची गरज नाही, म्हणूनच कुठल्याही व्यवसायात शिरण्यापूर्वी सरकारने स्वतःच्या व्यवसायावर कडक निर्बंध घातले पाहिजेत व काटकसर, जास्तीत जास्त उत्पादनक्षता, चोख प्रशासन ह्याविषयी काटेकोर नियम अंमलात आणन ते निष्ठुरपणे पाळले पाहिजेत; तरच सरकारी मालकीच्या व्यवसातली परिस्थिती सुधारू शकेल !'

## □ थोडे इकडेही लक्ष द्या !

मदुराईच्या त्यागराजाचा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सम्मेलनाप्रसंगी राष्ट्रगीत–गायनाचा कार्यक्रम विरोध करून, दंगल माजवून बंद पाडला आणि त्या ऐवजी " संघे मुझंगू " हे गीत वाजवायला, कार्यक्रमाच्या व कॉलेजच्या चालकांना भाग पाडले. हे सर्व तामिळनाडूचे शिक्षण मंत्री श्री. माधवन् ह्यांच्या साक्षीने घडले !

मुंबईच्या इस्माईल युसूफ कॉलेजमधील कलाविभागाच्या प्रथमवर्षाच्या पूर्वपरीक्षेत पुढील प्रश्न " भारतीय शासन " ह्या विषयावरील प्रश्नपत्रिकेत विचारला गेला होता. " पाकिस्तानची कल्पना कशी उदयास आली ? सन १९४९ मधील पाकिस्तानच्या अंतिम विजयाची कारणे सांगा. "

ह्या दोन्ही घटना राष्ट्रीय एकात्मतेला सुरूंग लावणाऱ्या नाहीत का ? शंका आली कारण, दोन्ही घटना घडून चार–पाच दिवस झाले तरी त्यांवर कुणीच काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही म्हणून ! एरवी, वेळीवेळी कुठलाही उद्रेक माजला, कुणी काही बोलले तरी राष्ट्रीय एकात्मतेचे नारे लावणारे सर्वच मंत्री, पुढारी गप्प बसते ना आणि हो, इस्माईल युसूफ कॉलेज सरकार चालवते हं ! ○

# पुरंदऱ्यांची दौलत
# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे
मूल्य साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७-ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर